अहवाल क्रमांक :१२८

# पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या चंद्रपूर, वर्धा व सोलापूर परिषदांच्या
सन २००३-२००४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन
अहवालातील परिच्छेदाबाबत

# तिसरा अहवाल

(सदर अहवाल दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी विधानसभेस/ विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१०

# पंचायती राज समिती

**(२०१०-२०११)**

**(बारावी महाराष्ट्र विधानसभा)**

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या चंद्रपूर, वर्धा  व सोलापूर परिषदांच्या सन २००३-२००४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

# तिसरा अहवाल

(तीन)

# पंचायती राज समिति

## (२०१०-२०११)

## (दिनांक ४ मार्च, २०१०)

## समिति प्रमुख

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

**समिती सदस्य**

२ ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

## (चार)

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव,

श्री.विलास आठवले, अवर सचिव,

---

**(पाच)**

## पंचायती राज समिती

**(२००८-२००९)**

**(दिनांक १४ ऑगस्ट २००८ पासून)**

**समिती प्रमुख**

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स.

**समिती सदस्य**

*२. श्री.राजन पाटील, वि.स.स.

३. श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.

४ श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

५ श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

६ श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

**७ रिक्त

८ श्री.पी.एन.पाटील, वि.स.स.

९ श्री. सुभाष बने, वि.स.स.

१० श्री.राजेंद्र मुळक, वि.स.स.

११ श्री.पद्माकर वळवी, वि.स.स.

१२ श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स.

१३ श्री.आशिष जयस्वाल, वि.स.स.

१४ श्री.तुकाराम सुर्वे, वि.स.स.

१५ श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

१६ श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१७ श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८ श्री.पी.टी.कांबळे, वि.स.स.

१९ श्री.विष्णू सवरा, वि.स.स.

२० श्री.हेमंत पटले, वि.स.स.

**(सहा)**

२१ श्री.राजन तेली, वि.प.स.

२२ श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

२३ श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

२४ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

२५ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव,

श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव,

श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव,

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

* सन्माननीय सदस्य श्री.नानाभाऊ पंचबुद्धे यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समोवश झालेला असल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर सन्मानलीय सदस्य श्री.राजन पाटील, वि.स.स. यांची दिनांक २९ जानेवारी, २००९ रोजी नामनियुक्ती करण्यात आली.

** सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे पद रिक्त.

(सात)

# पंचायती राज समिती
## (२००७-२००८)
## (दिनांक १४ फेब्रुवारी, २००७ पासून)

**समिती प्रमुख**

१. श्री.राजन पाटील, वि.स.स.

**समिती सदस्य**

२. श्री.नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.

३. श्री.दिलीप बनसोड, वि.स.स.

४ श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स.

५ श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

६ श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

*७ श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

८ ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.

९ श्री.सुभाष बने, वि.स.स.

१० श्री.राजेंद्र मुळक,वि.स.स.

११ श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.

१२ श्री.सुनिल केदार, वि.स.स.

१३ श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.

१४ श्री.कैलास पाटील, वि.स.स.

१५ श्री.विश्वास नांदेकर, वि.स.स.

१६ श्री.संजय राठोड, वि.स.स.

१७ श्री.अतुल देशकर, वि.स.स.

१८ श्री.उत्तम इंगळे, वि.स.स.

१९ श्री.साहेबराव घोडे, वि.स.स.

२० श्री.सदाशिव लोखंडे, वि.स.स.

**आठ**

**२१ रिक्त

२२ श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

२३ श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

२४ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

२५ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव,

श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव,

श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव,

---

* सन्माननीय सदस्य श्री. दिलीपकुमार सानंदा यांनी पंचायती राज समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर दिनांक २४ जुलै, २००७ रोजी श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली.

** श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांची दिनांक २४ फेब्रुवारी, २००८ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पद रिक्त आहे.

**(नऊ)**

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा पहिला अहवाल सादर करीत आहे.

सन २०१०-२०११ करिता समिती दिनांक ४ मार्च, २०१० रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय व महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००३-२००४ लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २००७-२००८ साठी गठीत झालेल्या समितीने चंद्रपूर, वर्धा व सोलापूर या जिल्हा परिषदांची सखोल तपासणी केली.

समितीने चंद्रपूर जिल्हा परिषदेस दिनांक २७, २८ व २९ डिसेंबर, २००७ रोजी भेट देऊन श्री.व्ही.एस.बरडे, प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एस.डी.चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने वर्धा जिल्हा परिषदेस दिनांक २५, २६ व २७ फेब्रुवारी, २००८ रोजी भेट देऊन श्रीमती गं ुजन किन्नु, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्रीमती शं.अ.डोंगरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वर्धा जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने सोलापूर जिल्हा परिषदेस दिनांक २८, २९ व ३० मे, २००८ रोजी भेट देऊन श्री.सु.म.केंद्रेकर., मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एस.आर.भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सोलापूर जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१०-२०११ करिता गठीत झालेल्या समितीने चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १२ मे २०१० व ९ जून, २०१० रोजी व वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ६ जुलै, २०१० रोजी तसेच सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झ ालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ८जून, २०१० रोजी जिल्हा परिषदेकडून प्राप्तसंबंधित मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

**(दहा)**

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. ठाकरे, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्रीमती शर्वरी गोखले, अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. संजय कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.सतिश गवई, प्रधान सचिव, सामाजिक न्याय, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या चंद्रपूर, वर्धा व सोलापूर जिल्हा परिषदांच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत..

सन २०१०-२०११ साठी गठित झालेल्या समितीने दिनांक डिसेंबर, २०१० रोजी च्या बैठकीत अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
नागपूर,
दिनांक : ९ डिसेंबर, २०१०.

**बबनराव शिंदे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

**(अकरा)**

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | परिच्छेद क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | | (४) |
| | | **प्रकरण एक**<br>**चंद्रपूर ज्रिल्हा परिषद** | | |
| १ | १.१ | जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती जमातीच्या तसेच १०३ विकास गटातील इयत्ता १ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना सन २००३-२००४ च्या वर्षातील गणवेशाचे वाटप व त्या वरील खर्चाबाबत | ३.८२ | |
| | | **प्रकरण दोन**<br>**सोलापूर जिल्हा परिषद** | | |
| २ | २.१ | मागसवर्गीयांचे घरावरील गवती छप्पर बदलून पन्हाळी पत्रे घालणे या योजनेवरील खर्चाबाबत | ३.४४७ | |
| ३ | | **प्रकरण तीन**<br>**वर्धा जिल्हा परिषद** | | |
| | ३.१ | ग्रामिण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत रस्त्यालगतची गटारे बांधकामातील अनियमितता. | ३.२४ | |
| | ३.२ | शालेय पोषण आहार अन्न शिजविणे मानधन वाटपामधील अनियमितता | ३.७५ | |

## चंद्रपूर जिल्हापरिषद

**जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती जमातीच्या तसेच १०३ विकास गटातील इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना सन २००३-०४ च्या वर्षातील गणवेशाचे वाटप व त्यावरील खर्चाबाबत (परिच्छेद क्र.३.८२)**

सन २००३-२००४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्रमांक १८) :- जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील अनुसुचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटपासाठी रुपये ३८,४७,०५३ इतका खर्च केला त्यावर लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत :-

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक ४ गणवेश/२००३/प्र.क्र.२००/पंरा-७ (२६), दिनांक २८ ऑक्टोबर, २००३ नुसार विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करण्यासाठीचे वेळापत्रक ठरविण्यात आले असताना त्याप्रमाणे पुरवठा आदेश देऊन १५ जानेवारी, २००४ पर्यंत कापड प्राप्त करणे, १५ नोव्हेंबर, २००३ पर्यंत गणवेश शिलाईसाठी निविदाचे अंतिमीकरण करणे, २९ फेब्रुवारी, २००४ पर्यंत तयार गणवेश संबंधित शिलाई संस्थेकडून प्राप्त करणे, १५ मार्च, २००४ पर्यंत संबंधित सर्व पंचायत समित्यांकडे गणवेश सुपूर्द करणे, तसेच १ जून, २००४ रोजी किंवा शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गणवेश वाटप करणे आवश्यक असताना जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूरचे पत्र क्रमांक शिक्षण/लेखा-१/३६/०४, दिनांक १६ मार्च, २००४ अन्वये फार विलंबाने पुरवठा आदेश निर्गमित केल्याने नियमबाह्यता झाल्याचे स्पष्ट होत आहे. जिल्हा परिषद स्तरावरील प्रशासकीय निष्क्रीयता. योग्य नियोजनाअभावी एकूण ५२१५९ लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक गणवेश/२००३/प्र.क्रमांक १४२/पंरा-७ नुसार परिशिष्ट ४ मधील सहकारी संस्थाद्वारेच/महामंडळाच्या उत्पादन केंद्रामार्फतच कापड उत्पादन केले जाते. याची खात्री होण्यासाठी चंद्रपूर जिल्हा परिषदेद्वारे उत्पादन केंद्राच्या तपासणीची व्यवस्था करणे आवश्यक असताना अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे लेखा परीक्षणास दिसून आले नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ७९ नुसार तातडीच्या संवितरणा व्यतिरिक्त पैसे काढू नयेत असे स्पष्टपणे नमूद असताना धनादेश क्रमांक ३२४७९०, दिनांक ३१ मार्च, २००४ अन्वये रुपये ९,६१,७६३ इतकी रक्कम प्रयोगशाळाअहवाल प्राप्त झाल्यानंतर देय असतांना व

प्रयोगशाळा अहवाल दिनांक ९ व १४ जून २००४ रोजी प्राप्त झाला असतांना वरीलप्रमाणे रक्कम काढण्यात आली आहे या नियमाबाह्यतेबाबत खुलासा करावा.

(४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूरचे पत्र क्रमांक शिक्षण/लेखा-१/गणवेश ०३-०३/७१/०४, दिनांक ३१ मार्च २००४ नुसार गणवेश कापड पुरवठा अद्याप झालेला नाही असे स्पष्टपणे नमूद आहे. परंतु महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मुंबईची देयक क्रमांक पीआय ५२३, दिनांक ३१ मार्च, २००४ रोजी प्रदान करण्याची कार्यवाही नियमबाह्य असल्याने खुलासा होणे आवश्यक आहे.

(५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूरचे पत्र क्रमांक शिक्षण/गणवेश/२००३-२००४/७१/०४, दिनांक ३१ मार्च, २००४ नुसार गणवेश पुरवठा अद्यापि झालेला नाही. परंतु साठा पंजीत पान क्रमांक ७९ वर दिनांक ३० मार्च, २००४ रोजी कापड पुरवठा केल्याचा दिनांक नमूद केला आहे. तरी वस्तुस्थिती बाबत खुलासा करण्यात यावा.

(६) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ९६ (१) नुसार साठा पंजीत व देयकावर तशी नोंद घेऊन/वस्तू मिळाल्याची खात्री पटवून त्याचे प्रदानास मंजूरी देणे आवश्यक असताना प्रदाने कशाच्या आधारावर मंजूर करण्यात आली याबाबत समर्पक खुलासा करण्यात यावा.

(७) एकूण लाभार्थी ५२१५९ पैकी ४ थी च्या एकूण अंदाजित १००० लाभार्थ्यांना सन २००३-२००४ मध्ये सदर लाभासाठी पात्र ठरविण्यात आले असताना सन २००४-२००५ मध्ये त्यांना लाभ देणे योग्य ठरत नाही.

(८) महाराष्ट्र शासन, परिपत्रक महसुल व वन विभाग क्रमांक एमटीपी १०६६/२५०१७४/एम, दिनांक १७ फेब्रुवारी, १९७२ व मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ मधील परिशिष्ट ५ अनुसार अनामत रकमेच्या ३ टक्के मुद्रांक शुल्काच्या स्टँप पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना तसे करण्यात न आल्याने रक्कम रुपये २,९८० पुरवठादाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद चंद्रपूर यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

(१) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. ४ गणवेश/२००३/प्र.क्र.२००/परा-७ २६ दि. २८ ऑक्टोबर, २००३ अनुसार दिनांक २०/१०/२००३ पावेतो कापड पुरवठ्याचा आदेश यंत्रमाग महामंडळाला द्यावयाचा होता. परंतू मा.शिक्षण संचालक म.रा.पुणे यांचेकडून त्याचे पत्र क्र. गणवेश-२००३-०४/नियमित/ड-५०८ दिनांक २७.११.२००३ आणि पत्र क्रमांक गणवेश-२००३-०४/१०३-विग/ड-५०८, दिनांक २७.०१.२००३ अन्वये अनुक्रमे नियमित आणि १०३ विकास गट योजनेकरीता एकूण रु. ५५,९८,०००/- तरतूद मंजूर करण्यात आली. परंतू सदर तरतूद प्रत्येक तिमाहीस तरतुदीच्या

१/४ प्रमाणात खर्च करावे अशी अट वरील पत्रात घालून असल्याने तरतूद मंजूरीनंतर जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या दिनांक २३.१२.२००३ च्या सभेतील ठराव क्रमांक ९(७) अन्वये घेण्यात येवून वरील अटीनूसार प्रत्येक तिमाहीप्रमाणे टप्प्याटप्प्याने कापड खरेदी करणे सोईस्कर नसल्यामुळे मार्च, ०३ मध्ये दिनांक १६.०३.२००३ रोजी एकमुस्त मागणीचा कापड पुरवठा आदेश यंत्रमाग महामंडळास देण्यात आला. तसेच गणवेश शिलाई संस्था निश्चित करणेसंदर्भात असलेल्या दिनांक १५.१०.२००३ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. २५ येथील निर्देशाप्रमाणे शिलाई संस्थाकडून निविदा मागवून वेळापत्रकानुसार शिलाई संस्था निश्चित करण्याची कार्यवाही ही दिनांक १५.११.२००३ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते. परंतू दरम्यान ग्राम विकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांक गणवे-२००४/प्र.क्र.५/पंरा ७ दिनांक १५.१०.२००३ अन्वये गणवेश शिलाईचे १०० टक्के काम हे जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा अंतर्गत असलेल्या महिला बचत गटांना देण्यात यावे अशाप्रकारचा सुधारीत निर्णय घेण्यात आला. त्यामुळे सदर निर्णयानुसार अंमलबजावणीस्तव प्रकल्प अधिकारी जिल्हा ग्रामीण यंत्रणा यांना गणवेश शिलाई कामासाठी इच्छूक महिला बचत गट व त्याचे गणवेश शिलाई दर आणि कामाची क्षमता इत्यादी बाबत माहितीकरीता विचारणा करण्यात आली. परंतू यामध्ये बराच कालावधी उलटून देखिल आवश्यक प्रतिसाद मिळाला नाही. परंतू त्यानंतर ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून पत्र क्रमांक गणवे-२००४/प्र.क्र.५/पंरा ७, दिनांक १६.०५.२००४ अन्वये, दिनांक १५.१०.२००३ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती कायम ठेवून महिला बचत गटांकडून स्पर्धात्मक निविदा मागविण्याबाबत सुचना देण्यात आल्यामुळे सदरहू बचत गटाकडून स्पर्धात्मक निविदा करीता कार्यालयाचे पत्र क्र. शिक्षण लेखा-१/९२/०४, दिनांक २३/०६/२००४ अन्वये वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्दी करीता देण्यात आली. जाहिरातीवरुन महिला बचत गटांकडून दिनांक २१/०७/२००४ रोजी प्राप्त झालेल्या निविदा वाटाघाटीनंतर अंतिम करण्यात येऊन ४ महिला बचत गटांना समप्रमाणात गणवेश शिलाईच्या कामाचा आदेश दिनांक ११.१०.२००४ रोजी देण्यात आलेला असून संबंधित बचत गटांनी विहित मुदतीत काम पूर्ण करुन फेब्रुवारी, २००५ मध्ये लाभार्थ्यांना गणवेशांचे वितरण झालेले आहे.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांक गणवे/२००३ प्र.क्र.१४२/पं.रा. ७, दिनांक १५.१०.२००३ मधील परिच्छेद क्रमांक ४ येथे गणवेशाचे कापड उत्पादीत करणारी एकूण १० उत्पादीत केंद्रे नमूद केलेली आहेत. परंतू वरील शासन निर्णयाद्वारे जिल्हा परिषद चंद्रपूर करीता गणवेशासाठी लागणारे कापड हे काणत्या उत्पादन केंद्रामार्फत उत्पादीत करण्यात येत आहे याबाबत कळविण्यात आलेले नाही. तसेच जि.प. सनियंत्रण यंत्रणेद्वारे विविध दहा ठिकाणच्या उत्पादन केंद्राची तपासणी ही पुरवठा आदेश दिल्याचे तारखेपासून यंत्रमाग महामंडळाने दिनांक ३०.०३.२००४ रोजी संपूर्ण कापडांचा पुरवठा केल्यामुळे या दरम्यानच्या अल्पशा कालावधीमध्ये उत्पादित केंद्राची तपासणी करण्याचे नियोजन शक्य

झाले नाही. तथापि, वरील शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे पुरवठादाराकडून संपूर्ण कापड जिल्हा परिषदेला प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदस्तरीय गठीत तपासणी समितीद्वारे तसेच विहीत प्रयोग शाळेमार्फत आवश्यक तपासण्या करण्यात आलेल्या असून सदर तपासणीमध्ये पुरवठा केलेले कापड शासन ठरवून दिलेल्या निकषा प्रमाणे

(As Per Specification) आढळलेले आहे.

(३) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांक गणवे/२००३ प्र.क्र.१४२/पंरा ७ दिनांक १५.१०.२००३ अन्वये परि. ११ अ व ब मध्ये महामंडळास त्यांचे देयकांची रक्कम अदा करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या असून त्यानूसार महाराष्ट्र यंत्रमाग महामंडळाने पुरवठा आदेश प्रमाणे संपूर्ण मालाचा पुरवठा केल्यानंतर एकूण मालाचे किंमतीचे देयक सादर केले होते. प्रदानाच्या वरील अटी व शर्ती प्रमाणे पुर्तता होणारे बिलाची रक्कम अदा करणे त्यांना भाग होते. परंतू पुरवठादाराचे देयक एकूण रक्कमेच्या मागणीचे असल्यामुळे एकुण रक्कमेची देयक योजनेला खर्ची घालुन पुरवठादारास अटी व शर्ती प्रमाणे देय होत असलेली रक्कम म्हणजे एकुण देयकाच्या ७५ टक्के रक्कम पूरवठादारांस प्रदान करण्यांत आली व उर्वरीत २५ टक्के रक्कम रुपये ९६१७६३/- जिल्हा निधीमध्ये ११- संकीर्ण ठेवी यामध्ये जमा ठेवण्यांत आली होती. सदर जमा ठेवण्यांत आलेली रक्कम संबंधीत प्रयोगशाळा तपासणीचा अहवाल प्राप्त झल्यानंतर व अहवालात कापड विहीत निकषानूसार (Specification) नमूद असल्याने दिनांक ५.०७.२००४ रोजी रुपये ९,६१,७६३/- यंत्रमाग महामंडळास अदा करण्यात आली आहे. त्यामुळे सदर व्यवहारात पूरवठादाराची बिलाची देय असलेली रक्कम जिल्हा परिषदेनी अटी व शर्तीनूसार प्रदान केली आहे.

(४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूरचे पत्र क्रमांक शिक्षण/लेखा.१/गणवेश/०३-०४/७१/०४, दिनांक ३१ मार्च, २००४ अन्वये दिनांक ३०.०३.२००४ अखेरची कामाची स्थिती विचारात घेण्यात येवून सन २००३-०४ आर्थिक वर्षातील कापड पूरवठादाराची तसेच गणवेश शिलाईची देयके दिनांक ३१.०३.२००४ नंतरच्या पुढील आर्थिक वर्षात देणे अपेक्षित असल्याने सदरहू प्रदानाकरीता आर्थिक तसेच प्रशासकीय अडचण निर्माण न होण्याचे दृष्टीने पुर्वनियोजन म्हणून सन २००३-०४ वर्षातील गणवेशाची अखर्चीत रक्कम जिल्हा निधीत वेगळी काढून ठेवण्यास परवानगीबाबतच्या प्रस्तावास वरील पत्रान्वये वस्तुस्थिती शासनास अवगत करण्यात आलेली होती. परंतू प्रत्यक्षात मात्र कापड पुरवठादारांनी दिनांक ३०.०३.२००४ रोजी कार्यालयीन वेळेनंतर मालाचा पुरवठा केल्यामुळे पुरविलेल्या कापडाची दिनांक ३१/३/२००४ जि.प.स्तरीय गठीत समितीमार्फत आवश्यक तपासणी करण्यात येऊन तपासणीत पुरविलेला माल शासनाने ठरविलेल्या विहित निकषानुसार (स्पेसिफिकेशन) आढळून आल्याबाबत अहवाल देण्यात आल्याने प्रदानचे अटी व शर्ती नुसार पुरवठादारास त्याच्या एकूण देय रकमेपैकी ७५ टक्के देयकाची रक्कम प्रदान

करण्यात आली आहे. त्यामुळे सदर व्यवहार हा शासन विहीत अटी व शर्ती नुसार झाला असल्याने यामध्ये नियमबाह्यता झालेली नाही.

(५) सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील अखर्चीत अनुदानामधून पुढील आर्थिक वर्षामध्ये गणवेश कापड खरेदी व गणवेश शिलाईच्या देयकाची प्रदाने करण्यामध्ये आर्थिक व प्रशासकीय अडचण निर्माण होवू नये या हेतूने दिनांक ३१.०३.२००४ अखेरची कामाची स्थिती एक दिवस पूर्व म्हणजे दिनांक ३०.०३.२००४ रोजीची स्थिती विचारात घेण्यात येवून तसे शासनाला मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र क्र. शिक्षण/गणवेश/२००३-०४/७१/०४, दिनांक ३१ मार्च, २००४ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु कापड पुरवठादाराने वरील पत्र निर्गमित झाल्यानंतर व दिनांक ३०.०३.२००४ रोजीच कार्यालयीन कालावधी संपल्यानंतर दिनांक ३०.०३.२००४ रोजी कापड पुरवठा केला. त्यामुळे कापड प्राप्तीचा दिनांक हा ३०.०३.२००४ नमूद करण्यात आला आहे. ही वस्तुस्थिती आहे.

(६) कापड पुरवठादाराने दिनांक ३०.०३.२००४ रोजी पुरवठा आदेशाप्रमाणे संपूर्ण मालाचा पुरवठा करुन सादर केलेल्या देयकाचे दिनांक ३१.०३.२००४ रोजी केलेले सदर देयकाचे प्रदान हे महाराष्ट्र जि.प.पं.सं.लेखा संहिता १९६८ चे नियम ९६(१) नुसार बिलावर आवश्यक प्रमाणपत्र नमूद केल्यानंतरच पुरवठादाराला एकूण देय रकमेपैकी ७५ टक्के रक्कम दिनांक ३१.०३.२००४ रोजी प्रदान करण्यात आलेली आहे.

(७) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक गणवे-१०९६/सीआर-४०८३/२६, दिनांक २९.०४.१९९७ अन्वये लाभार्थ्यांना योजनेचे गणवेश वितरण करण्याबाबत धोरण विहित करण्यात आलेले असून त्यानुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या निधीतून उपलब्ध होणारे गणवेश वाटप जून पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस वाटप करावयाचे आहेत. त्याप्रमाणे सन २००३-०४ आर्थिक वर्षाच्या निधीतून उपलब्ध होणारे गणवेश हे जून ०४ पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस वाटप करावयाचे होते. परंतू, ते फेब्रुवारी, ०५ मध्ये वितरीत करण्यात आले असून ते सन २००४-०५ चे शैक्षणिक सत्र मार्च, २००५ ला संपण्यापूर्वीच वितरीत झाले असल्याने वाटप सत्रात इयत्ता ४ थी चे १००० लाभार्थी उक्त कालावधीसाठी पात्र ठरत असल्याने त्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

(८) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक गणवे-२००३/प्रक्र १४२/पंरा-७, दिनांक १५.१०.२००३ मधील परिच्छेद ९ प्रमाणे रुपये १ लक्ष अनामत रकमेकरीता शासन परिपत्रक महसुल व वनविभाग क्रमांक एस.टी.पी. १०६६/२५०१/४/एन, दिनांक १७.०२.१९६२ व मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, १९५८ मधील परिच्छेद क्रमांक ५ अनुसार रुपये ३०००/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर पुरवठादाराकडून करारनामा भरुन घेणे आवश्यक होते परंतू वरील नियमाच्या माहिती अभावी ते रु. २०/- स्टॅम्प वर करारपत्र केले आहे.

तरी संबंधीत पुरवठादाराकडून उर्वरीत रक्कम रु. २९८०/- वसुल करण्याच्या हमीसह वसुलीनंतर तसा अनुपालन अहवाल सादर करण्यात येईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

चंद्रपूर जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, चंद्रपूर यांची दिनांक २७ डिसेंबर, २००७ रोजी साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी अशी विचारणा करण्यात आली की, गणवेश वाटप केव्हा करण्यात आले व शासननिर्णयानुसार ठरविलेल्या वेळापत्रकानुसार यासंबंधात कारवाई का करण्यात आली नाही. त्यावर असे सांगण्यात आले की, सन २००३-२००४ या वर्षासाठी शिक्षण संचालकांच्या पत्रानुसार गणवेषासाठी दिनांक २७.११.२००३ मध्ये निधी प्राप्त झालेला होता. कार्यवाही उशीराने सुरु झाल्याने सन २००३-२००४ चे गणवेश फेब्रुवारी,२००५ मध्ये पंचायत समित्यांना वितरीत केलेले आहेत. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, एवढा विलंब लागण्याचे कारण काय आहे. त्यावर असा खुलासा करण्यात आला की, सर्वसाधारण सभेची दिनांक २३.१२.२००३ रोजी मान्यता घेऊन दिनांक १६ मार्च,२००३ रोजी यंत्रमाग महामंडळास कापड पुरवठा करण्याचा आदेश देण्यात आला होता.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर आणखी कोणाची मान्यता घ्यावयाची होती. याबाबत कोणतेच अभिप्राय देण्यात आले नाहीत. परंतु शिक्षण अधिकारी यांनी असा ख ुलासा केला की, गणवेश वाटप करण्यास विलंब झालेला आहे. शिक्षण उप संचालक (प्रा.) यांच्या दिनांक २७.११.२००३ च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले आहे की, शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या भागातील प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती अंतर्गत शासनाकडून गणवेश व लेखन साहित्य सन १९७७ पासून देण्यात येते. या योजनेसाठी लेखाशिर्षांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदींच्या ५५ टक्के तरतूद खर्च करण्यास शासनाने संदर्भ क्रमां क-१ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. मात्र प्रत्येक तिमाहिकरिता या तरतूदीच्या १/४ रक्कमेच्या मर्यादेत खर्च होईल, याची दक्षता घेण्यात यावी. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हापरिषदेकडे तीन तिमाहिचे पैसे असतांना देखील विधार्थ्यांना गणवेश वाटप करण्यास उशीर झालेला आहे. पैसे व्यपगत होऊ नयेत म्हणून शासनाने १/४ मर्यादेचे बंधन घातलेले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेला तीन तिमाहीचे पैसे मिळालेले असताना देखील मुख्य लेखा तथा वित्त अधिकाऱ्यांनी का लक्ष घातले नाही. त्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी असा खुलासा केला की, दिनं ाक २४.१२.२००३ रोजी सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर त्याच

दिवशी कापडाची ऑर्डर देता आली असती. ऑर्डर दिल्यानंतर माल मिळण्यासाठी ४-६ आठवडे लागले असते. एका वेळी पूर्ण रक्कम खर्च करु शकलो असतो.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, लाभार्थीची संख्या किती होती व त्यात मुलांच्या व मुलींच्या गणवेशाची संख्या किती होती त्यावर असा खुलासा करण्यात आला की, एकूण ५२,१५९ लाभार्थी होते. त्यापैकी ५७ हजार विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. त्यामध्ये मुलींची संख्या २८,८५२ आणि मुलांची संख्या २९,१११ इतकी होती. प्रत्येक विद्यार्थ्यांकरिता वेगवेगळे कापड कापल्यामुळे कापडाची बचत झाली. त्यामुळे आपण जास्त विद्यार्थ्यांना गणवेश देऊ शकलो.

समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, लेखी उत्तरामध्ये ३१ मार्चपर्यंत कापडाचा पुरवठा झाला नाही असे नमूद करण्यात आले व दुसऱ्या बाजूला ३० मार्चला कार्यालयीन वेळेनंतर मालाचा पुरवठा झाला असे नमूद करुन मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांच्या पत्रान्वये मालाचा पुरवठा झाला नाही असे शासनास कळवितात व त्याच तारखेला पुरवठादारास त्याच्या एकूण देय रक्कमेपैकी ७५ टक्के रक्कमेचा धनादेश देतात यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. परंतु त्यांच्याकडून याबाबतचा खुलासा प्राप्त झाला नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, गणवेष शिलाईसाठी कापड प्राप्त झालेले असताना देखील ते गोडाऊनमध्ये सील करुन का ठेवण्यात आले होते. त्यावर असा खुलासा करण्यात आला की, सन २००३-२००४ मध्ये जे कापड मिळाले होते ते सील करण्यात आले नाही त्या कापडाचे गणवेश तयार करुन वाटप करण्यात आले आहे. सन २००१-२००२ चे कापड गोडाऊनमध्ये सील करण्यात आलेले आहे. गणवेश वाटपासाठी सन २००१-२००२ मध्ये शासनाकडून निधी प्राप्त झाला होता. सदर गणवेश शिलाईसाठी प्रत्येकी रुपये १७.३३ मिळाले होते. शिलाईच्या उर्वरित पैशातून अतिरिक्त कापड घेण्यात आलेले आहे. परंतु सदर कापड शिवण्यासाठी पैसा शिल्लक नसल्यामुळे ते कापड यशवंतनगर येथील गोडाऊनमध्ये पडून राहिले आहे. त्यावर समितीने गोडाऊनमध्ये किती मीटर कापड पडलेले आहे. याबाबत विचारणा केली असता असे सांगण्यात आले की, १३ हजार मीटर कापड गोडाऊनमध्ये सील करण्यात आले आहे. त्यावर समितीने असे निदेश दिले की, १३ हजार मीटर कापड गोडाऊनमध्ये पडून आहे यासंदर्भात संपूर्ण चौकशी करुन त्यासंदर्भातील अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावा.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, १३ हजार मीटर कापड ठेवलेले गोडाऊन उघडण्यास कोणत्या तांत्रिक अडचणी आल्या होत्या. त्यावर असा खुलासा करण्यात आला की, सदर गणवेश शिवतांना त्यामध्ये चुका झाल्या आहेत, ते गणवेश मोजमापापेक्षा आखूड शिवण्यात आले आहेत, १७,९१६ गणवेश गोडाऊनमध्ये सील करण्यात आले आहेत व त्याबाबत संबंधित शिलाई यंत्रणेने पोलीस तक्रार केलेली आहे. हे प्रकरण आता न्यायप्रविष्ठ आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, या सर्व बाबींमध्ये विसंगती आढळून येत

आहे. सदर प्रकरणामध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अशी कोणती परिस्थिती निर्माण झाली होती की, त्यामुळे गुन्हा दाखल करावा लागला. त्यावर असे सं ागण्यात आले की, सन २००४ मध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. संबंधित शिलाई यंत्रणेने मोजमापाप्रमाणे गणवेश शिलाई करुन दिले नाहीत. दिनांक ३ जुलै,२००६ च्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीमध्ये सदर गोडाऊनला सील लावण्याचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार गोडाऊनला सील लावण्यात आले आहे. त्यावर समितीने सर्वसाधारण सभेने ठराव केल्यानंतर सील लावता येते काय तसेच सदर गुन्हा कोणाच्या विरोधात नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत विचारणा केली असता असा खुलासा करण्यात आला की, सिध्दीविनायक संस्था, नाशिक व चेतना इंटरप्राईजेस जळगाव या दोन संस्थाविरुध्द दिनांक १३ फेब्रुवारी,२००४ रोजी पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर दाखल केलेला आहे. परंतु पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर नोंदवून घेतला नाही.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याकडून एफ.आय.आर दाखल केला आहे, असे सांगण्यात येत आहे व पोलीस स्टेशनमध्ये तक्रार अर्ज सादर केलेला आहे असे. शिक्षणाधिकारी सांगत आहेत परंतु त्यांच्याकडे तक्रार अर्जाची एकही प्रत नाही, तसेच या प्रकरणाची दखल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील घेतलेली नाही. त्यावरुन एकूणच या केसच्या संदर्भात विसंगत अशी उत्तरे मिळत असल्यामुळे दिनांक २९ डिसेंबर २००७ रोजीच्या बैठकीला एस.पी.यांना बोलाविण्यात आले. त्यावेळी त्यांनी असा खुलासा केला की, गणवेशाचे कापड नाशिकच्या संस्थेला दिले होते. त्यासंबंधात रामनगर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. सदर प्रकरण हे दिवाणी स्वरुपाचे असल्याने त्यावर त्यांना कार्यवाही करण्याचा अधिकार नाही. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सदर तक्रार ही अफरातफरीची असल्याने त्याबाबतची माहिती घेवून समितीला देण्यात यावी. त्यांनतर शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी सविस्तर माहिती देताना असे सांगितले की, सन २००२-२००३ मध्ये सदर योजनेसाठी एकूण प्राप्त तरतूद ८१.१० लाख रुपये होती. दिनांक २७ मार्च,२००३ ला यासाठी प्रशासकीय मंजुरी मिळाली त्यानुसार गणवेश शिलाईसाठी ६४.८८ लाख रुपये आणि लेखन साहित्यासाठी १६ लाख रुपये उपलब्ध होते. गणवेशाच्या कापडासाठी यंत्रमाग महामंडळाकडे आपण १२.९.२००३ ला ऑडर दिली. १,१२,८६००० मीटर कापड घेतले. शासन निर्णयानुसार गणवेश शिलाईसाठी दिनांक १६/९/२००३ ला निविदांसाठी जाहिरात दिली होती आणि त्या साऱ्या प्रक्रियेनुसार आदर्श कंपनी यांनी दर दिले होते. त्यात मुलाचा गणवेश १६ पैसे आणि मुलींसाठी ३.३३ रुपये इतका दर त्यांनी दिला होता.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्दयांसंदर्भात अधिक माहिती मागविली.

१) सन २००३-०४ मध्ये तीन तिमाहीचे पैसे उपलब्ध असतांना अनु.जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यांत आलेले नाही. याची कारणे काय आहेत ? या प्रकरणी कोणकोणते अधिकारी जबाबदार आहेत व अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली आहे. अद्याप कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

२) ३० मार्च २००४ ला कापड प्राप्त झाल्याची रजिस्टरला नोंद असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ३१ मार्च, २००४ पर्यंत कापडाचा पुरवठा झालेला नाही असे शासनाला पत्राव्दारे कळविले आहे आणि ३१ मार्च रोजी पुरवठादारास एकूण देय रक्कमेपैकी ७५ टक्के रकमेचा धनादेश दिलेला आहे. याबाबत अधिक खुलासा करण्यांत यावा.

३) सन २००१-२००२ पासून शालेय गणवेशाचे कापड गोडावूनमध्ये पडून आहे. सदर गोडावूनला सील लावण्यांची कारणे काय आहेत ? या संदर्भात शासनाकडे चौकशी अहवाल केव्हा सादर करण्यात आला आहे व सादर केलेल्या अहवालाचे स्वरुप काय आहे ?

४) दिनांक ६-७-१९९९ ला जिल्हापरिषदेने गणवेष शिवणाऱ्या संस्थेविरुध्द FIR दाखल केल्यावर दिवाणी गुन्ह्याच्या प्रक्रियेमुळे विलंब झाल्याचे अतिरिक्त पोलीस अधिक्षकांनी सांगितले त्याची सद्यस्थिती काय आहे ? या प्रकरणाबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जि.प.कडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

सन २००३-०४ या आर्थीक वर्षात प्राप्त तरतुदीस महा.जि.प.व.पं.स. लेखा संहिता १९६८ चे परिशीष्ट १ भाग दोन मधील तरतुदीनुसार प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यांस जि.प. सर्वसाधारण सभा सक्षम आहे. त्यानुसार प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतरच प्राप्त तरतुद खर्च करण्याची कार्यवाही करण्यांत आली. सन २००३-०४ या आर्थीक वर्षात प्राप्त तरतुदीतुन पात्र विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.

जि.प.ने आदेशित केल्यानुसार कापड राहूल ट्रान्सपोर्ट, पडोली, चंद्रपूर यांचेकडे दिनांक ३०.३.२००४ ला प्राप्त झाले होते. परंतु, याबाबत प्रत्यक्षात कापड प्राप्त झाले किंवा नाही याची माहिती जि.प.कडे नसल्यामुळे, शासनास तसे कळविण्यांत आले. मात्र, राहूल ट्रान्सपोर्ट चे कर्मचारी दिनांक ३१.३.२००४ ला डिलीव्हरी मेमो घेऊन आल्यामुळे , रजिस्टरला कापड प्राप्त झाल्याची नोंद घेण्यांत आली त्यानुसार दिनांक ३१.३.२००४ ला संबंधित पुरवठादारास एकूण देय रकमेच्या ७५% रक्कम अदा करण्यांत आली.

सन २००१-०२ या आर्थीक वर्षात गणवेशाचे शिलाई दर फारच कमी प्राप्त झाल्याने शिलाईच्या शिल्लक निधीतुन अतिरिक्त कापड खरेदी करण्यात आले होते व ते गोडाऊन मध्ये ठेवण्यांत आले होते. मात्र

जि.प.सर्वसाधारण सभेने ठराव घेऊन गोडावून सिल केले. या संदर्भात चौकशी अहवाल या कार्यालयाचे पत्र दिनांक २८.३.२००७ व २१.१०.२००७ ला शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. चौकशी अहवालाच्या स्वरुपानुसार तत्कालिन शिक्षण विभागातील यंत्रणांनी वेळीच कार्यवाही केली नाही. परंतु आता शिल्लक कापडाचे पंचायत समिती निहाय वितरण करण्यात आलेले आहे व त्याचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना देण्यात आलेला आहे.

सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात चेतना इंटरप्राईचेस, ई-७५ एमआयडीसी जळगाव यांचेविरुध्द एफ आय आर दाखल करण्यासंबंधिचे कार्यालयीन पत्र क्र/शिक्षण/लेखा-१/२००१-२००२/३३/०३ दिनांक १३ फेब्रुवारी, २००४ अन्वये दिनांक १३.२.२००४ रोजी ठाणेदार, रामनगर पोलिस स्टेशन, चंद्रपूर यांना पत्र देण्यात आलेले होते. याबाबतीत पोलिस स्टेशन रामनगर येथे प्रत्यक्ष संपर्क साधला असता सदरबाब ही अदखलपात्र असुन ते दिवानी गुन्ह्यामध्ये समाविष्ट होत असल्यामुळे एफ आय आर दाखल करण्यात आलेला नाही. अशी मौखिक माहिती पोलिस स्टेशन रामनगर यांचेकडुन देण्यात आलेली आहे.

**सचिवांची साक्ष :-**

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ९ जून, २०१० रोजी संबंधित विभागाची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीने अशी विचारणा केली की, सन २००१-०२ पासून गणवेशाचे कापड गोडावून मध्ये पडून असण्याचे कारण काय आहे. तसेच यासंबंधीचा चौकशी अहवाल शासनाकडे केव्हा सादर करण्यात आला. त्यावर जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, सदर वर्षात ७० लाख एवढी तरतूद गणवेषासाठी प्राप्त झाली होती. त्यात गणवेष शिलाईसाठी ५८ लाख आणि लेखन साहित्यासाठी १२ लाखाची तरतूद अंतर्भूत होती. गणवेषाचे कापड महाराष्ट्र यंत्रभाग महामंडळ यांच्याकडून घ्यावयाचे होते परंतु त्याला शा.नि. ग्रामविकास विभाग दि. ७ जून, २००२ प्रमाणे स्थगिती दिली होती. कारण दर वाढविण्यासंबंधीची चर्चा शासनस्तरावर सुरु होती व ही स्थगिती उठविल्यानंतर सन २००१-०२ चा निधी सन २००२-२००३ मध्ये खर्च करण्यासाठी शासनाने मान्यता दिली होती. त्यानंतर गणवेषाचे कापड खरेदी करण्यात आले. शिलाईसाठी शासनाकडून १७.३३ रुपये प्रती ड्रेस एवढी तरतूद असताना प्रत्यक्षात निविदा २.९९ पैसे याप्रमाणे प्राप्त झाल्यामुळे त्यातील निधी शिल्लक राहिला. त्यामुळे शासनाच्या दुसऱ्या जी.आर. मधील तरतूदीनुसार रक्कम शिल्लक राहिल्याने सन २००२-०३ मध्ये कापड खरेदी करण्यात आले. दरम्यान ज्या संस्थेने कमी दरात ड्रेसची शिलाई केली होती. त्या संस्थेला हे ड्रेस शिवण्यासाठी ६ आठवडयांची मुदत दिली होती. परंतु सदर ड्रेस शिवण्यासाठी त्यांना ११ आठवडयांचा कालावधी लागला. मधल्या काळात संस्थेने कपडे

लवकर शिवून दयावेत म्हणून शिक्षणधिकाऱ्यांनी पोलीस तक्रार केली. त्यासंदर्भात FIR दाखल करण्यात आला नव्हता. संस्थेने पहिलेच ड्रेस उशिरा शिवून दिल्यामुळे दुसरे ड्रेस त्या संस्थेला दिले नाही व ते कापड गोडावून मध्ये ठेवण्यात आले. समितीने सदर कापड २००३ पासून २००८ पर्यंत गोडावून मध्ये पडून होते. त्या कापडाची स्थिती काय होती. याबाबत विचारणा केली असता. असा खुलासा करण्यात आला की, शिलाईसाठी जि.प.कडे फक्त ३० हजार रुपये होते. तसेच कोणतीही संस्था हे काम करण्यास तयार नव्हती म्हणून शासनाकडे १.७० लाख रुपयाची मागणी करण्यात आली. परंतु शासनाकडून निधी प्राप्त झाला नाही. त्यामुळे ६.१९ लाख एवढया किंमतीचे १३ हजार मीटर कापड गोडावून मध्ये पडून होते. या संदर्भात जि.प च्या सर्वसाधारण सभेत यावर चर्चा झाली व सदर कापड गोडावून मध्ये ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला व कापड सील करण्यात आले. समितीने जेव्हा भेट दिली त्यावेळी समितीच्या सदर बाब निदर्शनास आली व सील उघडण्यात आले. त्यानंतर मार्च, २००८ मध्ये सदर कपडयाची आय.टी.आय. कडून तपासणी करण्यात आली व तपासणीत सदर कापड चांगल्या स्थिती असल्याचे आढळून आले. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जि.प. ने ठराव करुन गणवेशाचे कापड गोदामात ठेवून त्याला सील केले त्यामुळे सदर कापड ४-५ वर्ष गोदामात पडून होते त्यामुळे विद्यार्थ्यांना गणवेष मिळाला नाही असे झाले नाही.

**अभिप्राय शिफारशी :**

चंद्रपूर जिल्हापरिषेदेने प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती जमातीच्या तसेच १०३ विकास गटातील इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना सन २००३-२००४ या वर्षातील गणवेशाचे वाटप केले. त्यासाठी एकूण रक्कम रुपये ३८,४७,०५३/- खर्च केली. यासंदर्भात जिल्हापरिषदेन दिलेल्या लेखी व साक्षीच्यावेळी समितीला दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, **शासनामार्फत विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करण्यासाठीचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले होते. सदर वेळापत्रकानुसार १५ जानेवारी,२००४** पर्यंत कापड प्राप्त करुन घेणे, गणवेश शिवून घेण्याबाबतच्या निविदांचे अंतिमिकरण दिनांक १५ नोव्हेंबर, २००३ पर्यंत करुन संस्थाकडून दि. २९ फेब्रुवारी, २००४ पर्यंत गणवेष प्राप्त करुन घेणे अपेक्षित होते व त्यांचे प्रत्यक्षात वाटप १ जून, २००४ ला करावयाचे होते. परंतु जि.प.ने शिक्षण संचालक , पुणे यांच्या पत्राचा दाखला देवून सदर योजनेचा निधी हा टप्प्याटप्पयाने प्राप्त होणार असल्याने जि.प,ने. कापड पुरवठा आदेश दिनांक १६ मार्च, २००४ ला दिला व दिनांक २१.७.२००४ रोजी निविदांचे अंतिमीकरण करुन शिलाईचे आदेश दिनांक ११.१०.२००४ रोजी देण्यात आले व गणवेषाचे वाटप फेब्रुवारी, २००५ मध्ये करण्यात आले व असे करीत असताना निधीचे वाटप टप्प्या टप्पयाने होणार असल्याचे कारण पुढे केले यावरुन जि.प.ची प्रशासकीय निष्क्रीयता व अयोग्य नियोजन दिसून येते. जिल्हापरिषदेने कापड पुरवठा आदेश दिनांक १६ मार्च, २००४

रोजी दिला. परंतु कापडाचा पुरवठा कधी करण्यात आला, कापडाच्या दर्जाबाबतची तपासणी तसेच महिला बचत गटाकडून शिवलेले गणवेश जिल्हापरिषदेला केव्हा प्राप्त झाले इत्यादीबाबतची माहिती समितीला साक्षीच्या वेळी मिळू शकली नाही. **विद्यार्थ्यांना गणवेश वाटप योजनेची अंमलबजावणी शासनाने निश्चित केलेल्या कालावधीत करणे आवश्यक असताना शासनाच्या वेळापत्रकाचे पालन जि.प मार्फत करण्यात आले नाही व त्याच्या अयोग्य नियोजनामुळे ५२१५९ विद्यार्थी लाभापासून वंचित राहिले. यास जे संबंधित अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु जि.प.कडून प्राप्त झालेल्या माहितीवरुन जिल्हापरिषदेमार्फत कोणावरही अद्यापर्यंत कार्यवाही केली नाही याचे समितीला आश्चर्य वाटते. सबब, सदर प्रकरण ज्यासंबंधितांनी निष्काळजीपणे हाताळले त्यासर्व संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीला लवकरात लवकर पाठविण्यात यावा अशी शिफारस समिती करीत आहे.**

समितीला साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या अधिक माहितीवरुन सन २००१-०२ व २००२-०३ या वर्षासाठी जिल्हा परिषदमार्फत राबविण्यात आलेल्या गणवेष वाटपाच्या योजनेत देखील अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले. सन २००१-२००२ मध्ये गणवेश वाटपासाठी प्राप्त झालेला निधी २००२-२००३ मध्ये खर्च करण्यास शासनाने मान्यता दिली त्यानुसार कापड खरेदी करण्यात आली. शासनाकडून शिलाईसाठी १७.३३ रुपये प्रती ड्रेस एवढी तरतूद करण्यात आली होती. परंतु जि.प. चंद्रपूरला रु.२.९९/- प्रती ड्रेस याप्रमाणे ड्रेस शिवून मिळाल्याने शिलाईचा निधी शिल्लक राहीला व त्यातून कापड खरेदी करण्यात आले. जिल्हा परिषदेने ज्या संस्थेला गणवेश शिवण्यासाठी दिले त्यांनी गणवेष विहित मुदतीत दिले नाही म्हणून सदर संस्थेविरुध्द पोलीसात तक्रार दाखल करण्यात आली. त्यामुळे वाचलेल्या शिलाईच्या पैशातून खरेदी केलेल्या कापडाचे गणवेष शिवण्यासाठी देण्यात आले नाही व सदर कापड गोडावून मध्ये ठेवण्यात आले असे साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमुद करणे व त्यानंतर पुढे सदर कपड्यांचे गणवेष शिवण्यासाठी जि.प.कडे निधी उपलब्ध नव्हता म्हणून सदर कापड गोडावूनमध्ये पडून राहणे अशी दोन कारणे मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.चंद्रपूर यांच्यामार्फत सांगण्यात येणे याबाबत समितीला आश्चर्य वाटत असून कापड गोडावूनमध्ये इतके वर्ष पडून राहण्याचे कारण समितीला अद्यापपर्यत उमजू शकले नाही. तसेच जि.प.चंद्रपूर येथे झालेल्या साक्षीत गोडावूनला सील का लावण्यात आले होते या प्रश्नाचे उत्तर देताना काही तांत्रिक अडचणीमुळे ते उघडता आले नाही असा खुलासा जिल्हापरिषदेमार्फत करण्यात आला. परंतु तांत्रिक अडचणीच्या स्वरुपाची विचारणा केली असता. गणवेश शिवताना यामध्ये चुका झाल्या आहेत व त्यासंदर्भात शिलाई यंत्रणेविरुध्द पोलीस तक्रार केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे ही माहिती साक्षीच्यावेळी समितीपुढे आली. **संबंधित अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारची विसंगत माहिती सांगण्यात आल्याने समितीने**

**दुसऱ्या दिवशी एस.पी.ना या मुद्यांच्या संदर्भात बैठकीसाठी बोलवावे लागले तेव्हा त्यांच्याकडून सदर प्रकरणाबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल असून ती दिवाणी स्वरुपाची असल्याचे उघड झाले. यावरुन जिल्हा परिषदेचे अधिकारी कोणत्याही प्रकारचा अभ्यास न करता समिती समोर उत्तरे देतात. हे दिसून येते. एखाद्या प्रकरणाची अशा प्रकारे विसंगत माहिती देवून समितीची दिशाभूल करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी. तसेच गणवेश शिवणाऱ्या संस्थेविरुध्द दाखल करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढे काय कार्यवाही झाली आहे याबाबतची माहिती देखील समितीला पाठविण्यात यावी. अशी शिफारस समिती करीत आहे.**

## जिल्हा परिषद वर्धा

**ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमातर्गत रस्त्यालगतची गटारे बांधकामातील अनियमितता (परिच्छेद ३.२४)**

सन २००३-२००४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्रमांक २९)-- जिल्हा परिषद वर्धा यांनी ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत रस्त्यालगतची गटारे बांधकाम करण्यासाठी एकूण रक्कम रुपये ४७,५४२/- इतका खर्च केला आहे. त्याबाबत लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत :-

ग्रामपंचायत केळझरकडून गटारे बांधकामाबाबत प्राकलन तयार केल्याचे आढळून आलेले नाही. तसेच प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सुध्दा घेण्यात आल्याचे दिसून येत नाही व सदर बांधकामाचे मोजमाप मूल्यांकन सुध्दा घेण्यात आलेले नाही व पूर्णत्वाचे प्रमाणपत्र सुध्दा घेण्यात न आल्यामुळे गटारे बांधकाम झ ााल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री होत नाही. तरी तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी, मोजमाप मूल्यांकन तसेच पूर्णत्वाचे प्रमाणपत्रासह गटारे बांधकाम झाल्याबाबत खात्री पटवावी.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद वर्धा यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाअंतर्गत रस्त्या लगतची गटारे बांधकामाकरीता सन २००३-०४ मध्ये जि.प.कडून ६० टक्के रक्कम रुपये २३,१२५/- व लोक वर्गणीची ४० टक्के रक्कम रु. १५,४१७/- अशी एकूण रु.३८,५४२/- प्राप्त झाली.

ग्रामपंचायत केळझरकडून गटारे बांधकामाचे प्राकलन तयार करण्यात आले असून त्याची प्राकलनीय किंमत रुपये ४३,९२५/- आहे. सदर प्राकलनास तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असून तांत्रिक मान्यता क्र. २०/ उपअभियंता /०३-०४ आहे. तसेच या कामास ग्राम पंचायतने ठराव क १४/२, दि. २०/०७/०४ नुसार प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

सदर काम पूर्ण झाले असून झालेल्या कामाची नोंद ग्राम पंचायतचे नमुना क्र. २३ चे मोजमाप पुस्तिकेतील पान क्र. २७ ते २९ वर घेण्यात आलेली आहे. सदर कामावर ग्राम पंचायतने एकूण रु. ४२,९७०/- खर्च केला असून झालेल्या कामाचे मुल्यांकन रु.४३,२०४/- एवढे आहे. काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

वर्धा जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद वर्धा यांची दिनांक २५ फेब्रुवारी २००८ रोजी साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदर काम कोणत्या वर्षातील आहे व त्यास प्रशासकीय मान्यता केव्हा मिळाली त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर काम सन २००३-०४ या वर्षातील आहे व त्यास दिनांक २०.०७.२००४ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. समितीने पुढे अशी विचारणा केली की सन २००३-२००४ मघील गटार बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता सन २००४-२००५ मध्ये घेण्याचे कारण काय आहे तसेच सदर कामास तांत्रिक मान्यता केव्हा मिळाली होती त्यावर असा खुलासा करण्यात आला की, सदर कामास सन २००३-०४ मध्ये तांत्रिक मान्यता मिळाली परंतु कामासाठी निधी उशीरा मिळाल्यामुळे प्रशासकीय मान्यता नंतर घेण्यात आली समितीने प्रशासकीय मान्यता मिळण्यापूर्वीच सदर काम पूर्ण झाले होते काय, व त्याची वर्क ऑर्डर होती काय अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, सदर काम दिनांक २२.०९.२००४ रोजी पूर्ण झाले असून ते प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर पूर्ण झाले आहे तसेच सदर काम ग्रामपंचायतीचे असल्यामुळे त्याला वर्क ऑर्डर नव्हती.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळणारच असे गृहित धरुन काम सुरु करण्यात आले होते. त्यावर असा खुलासा करण्यात आला की, सदर योजना राज्य शासनाची होती. गटारे बांधकामासाठी जिल्हा स्तरावर नियोजन करुन पैसे पाठविण्यात आले होते. तसेच सदर कामास प्रशासकीय मान्यता जिल्हा परिषदेची जनरल बॉडी देत असते. दिनांक २९ जुलै,२००३ च्या शासन निर्णयानुसार रुपये २ लक्ष एवढे अनुदान जिल्हा परिषदेला प्राप्त झालेले होते. सुधारीत अनुदानाची ऑर्डर दिनांक ३१ मार्च,२००४ ची आहे. त्यानुसारच अंतिम सुधारित अनुदान दिले होते आणि त्याच दिवशी ते अनुदान ग्रामपंचायतीला वितरित करण्यात आले होते. त्यानंतर सदर कामास ग्रामपंचायतीने त्यांच्या पातळीवर प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे. सन २००३ च्या शासन निर्णयामध्ये प्रशासकीय मान्यता कोणी द्यावी या संदर्भातील उल्लेख नाही परंतु सन १९९१ च्या शासन निर्णयामध्ये योजना कशी राबवावी या संदर्भातील उल्लेख आहे, त्याचा आधार घेऊन जिल्हा परिषदेतील सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे, असा उल्लेख सन १९९१ च्या शासन निर्णयामध्ये आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सदर

शासन निर्णयात नंतर बदल झाला आहे काय. त्यावर असे सांगण्यात आले की, सदर कामासंदर्भात सन १९९१ च्या शासन निर्णयाचा आधार घेण्यात आलेला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना वेगवेगळया रकमेसंदर्भात अधिकार प्राप्त आहेत. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सदर कामास जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेने प्रशासकीय मान्यता दिली असे एकदा सांगण् व त्यांनतर ग्रामपंचायतीने प्रशासकीय मान्यता दिली असे सांगणे यावरुन सदर कामास नेमकी कोणी प्रशासकीय मान्यता दिली याचा नेमका बोध होत नाही.

समितीने उपरोकत माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील मुद्दयाबाबतची माहिती मागविली.

१. सन २००३-२००४ मधील गटारे बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता द्यावी यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी संदिग्ध उत्तर दिल्याने याबाबत नेमकी वस्तुस्थिती अथवा शासनाच्या काय सूचना आहेत याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी ?

२. सदर कामावर खर्च करण्यात आलेल्या खर्चाबाबतची तसेच कामाचे प्राकलन, कामकाजाचे मोजमाप व त्यांचे मुल्यांकन इत्यादी बाबतची कागदपत्रे लेखा परिक्षकांना दाखविण्यात आली आहेत किंवा नाही ? नसल्यास त्यास कोण जबाबदार आहे.

उपरोक्त मुद्दयांच्या अनुषंगाने जि.प. वर्धाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

शासन निर्णय क्रमांक ग्रास्वका १०९० / प्र.क्र. १०६१ / ३१, दिनांक १३/१२/१९९१ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १२५ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची प्रशासकीय मान्यता द्यावयाची होती. त्यानुसार संबंधित बांधकामाकरिता वितरीत अनुदानास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आदेश क्रमांक जिपव / ग्राप / ग्रास्वका / वशी २७३६ /०८ दिनांक २३/९/२००८ नुसार कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली आहे.

२. सन २००३-२००४ या वर्षात ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाच्या अंतर्गत गटारे बांधकामाकरिता शासनाचे आदेश दिनांक १२.१.२००४ अन्वये अनुदान प्राप्त झाले. त्यानुसार, या कार्यालयाचे आदेश दिनांक १६/३/२००४ अन्वये अनुदानाची रक्कम म्हणून पंचायत समिती सेलु यांना रु.२३१२५/- वितरित करण्यात आले, सदर निधी पंचायत समिती सेलु यांनी ग्रामपंचायत केळझर ला दिनांक ३१.३.२००४ रोजी वितरीत केला. ग्रामपंचायतीने सदर, काम दि. २२.९.२००४ रोजी पुर्ण केले आहे. तथापि, पंचायत समिती स्तरावर लेखापरिक्षण दिनांक ९.८.२००४ ते दि.२१.८.२००४ या कालावधी मध्ये झाले. लेखापरिक्षणाचे वेळी कामपूर्ण व्हावयाचे होते, लेखापरिक्षण हे पंचायत समिती स्तरावर झाले व अभिलेखे ग्रामपंचायत स्तरावरील लेखापरिक्षणाचे वेळी सदर दाखविता आले नाही. ग्रामपंचायत स्तरावरील लेखापरिक्षणाचे वेळी सदर अभिलेखे

लेखापरिक्षणाकरिता रेकॉर्ड उपलब्ध करून न दिल्यामुळे संबंधित ग्रामसेवक यांना जि.प. वर्धा चे आदेश क्र. जिपव/ग्राम/ग्रास्वअ/वधी ६०५/०९, दि. ३०.३.२००९ चे आदेशान्वये ताकीद देण्यात आली. आहे.

**सचिवांची साक्ष**

समितीने उपरोक्त माहितीच्या आधारे दिनांक ६ जुलै, २०१० रोजी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली साक्षी दरम्यान समितीने सदर कामाबाबतची सविस्तर माहिती विचारली असता सचिवांनी असा खुलासा केला की, सन १९९२ च्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हापरिषदेच्या सक्षम अधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक होते परंतु सदर कामाच्या प्रशासकीय मान्यतेस कायोत्तर मंजूरी जिल्हापरिषदेने दिलेली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्यावेळी लेखा परिक्षकांना कागदपत्रे दाखविण्यात आली होती का त्यावर असे सांगण्यात आले की, ज्यावेही लेखा परिक्षण करण्यात आले त्यावेळी कागदपत्र ग्रामपंचायत स्तरावर होती त्यामुळे ती दाखवण्यात आली नाहीत परंतु त्यांनतर सदर कागदपत्र दाखविण्यात आली आहेत.

**अभिप्राय व शिफारसी -**

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत रस्त्यालगतची गटारे बांधकाम करण्यासाठी एकूण रक्कम रुपये ४७,५४२/- इतका खर्च केला. याबाबत जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, सदर कामाचे प्राकलन व घेतलेली तांत्रिक मान्यता याबाबतची माहिती लेखापरिक्षकांना लेखपरिक्षणाच्या वेळी दाखविण्यात आली नाही तसेच सदर कामास प्रशासकीय मान्यता ही जिल्हापरिषदेच्या सक्षम अधिकाऱ्यांनी देणे आवश्यक होते परंतु सदर प्रकरणी जिल्हा परिषदेने कार्योत्तर मंजूरी दिली आहे ही बाब जि.प च्या नंतर निदर्शनास आली व त्यानंतर म्हणजे समितीने जि.प ला भेट दिल्यानंतर दि. २३/९/२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कार्योत्तर मंजूरी घेतली यावरुन जि.प प्रशासन शासनामार्फत आखून दिलेल्या सूचनांचे पालन केले जात नाही असे दिसून येते लेखापरिक्षक **ज्यावेळी जि.प चे लेखापरिक्षण करण्यास येतात तेव्हा त्यांनी मागणी केलेली सर्व कागदपत्रे त्यांना दाखविण्यात यावीत याबाबत शासनाने वेळोवेळी परिपत्रकाव्दारे निदेश दिले आहेत. परंतु सदर प्रकरणी जि.प वर्धा मार्फत त्याचे पालन झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे सदर मुद्दा समितीपुढे आला व समितीचा बहुमुल्य वेळ वाया गेला. सबब, ज्या संबंधितांनी सदर कागदपत्रे लेखापरिक्षणास दाखविली नाहीत त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

**शालेय पोषणआहार-अन्न शिजविणे मानधन वाटपामधील अनियमिततेबाबत-**

**(परिच्छेद क्रमांक ३.७५)**

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्रमांक ६६) जिल्हा परिषद वर्धा यांनी शालेय पोषण आहार-अन्न शिजवणे, मानधन वाटपाकरिता एकूण रक्कम रुपये १२,२१,००० इतका खर्च केला त्याबाबत लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद केले आहेत.

(१) शालेय पोषण आहाराकरिता वाटप करावयाची रक्कम गट शिक्षणाधिकारी आष्टी, आर्वी, समुद्रपूर, सेलू व देवळी यांना धनादेश वाटप केल्यानंतर उर्वरित रक्कम रुपये ३,९७,७५०/- सौ. आर.आर.भोयर यांना उर्वरित गट शिक्षणाधिकारी यांना वाटपाकरिता रोखीने प्रदान करण्याचे प्रयोजन स्पष्ट करणे आवश्यक आहे.

(२) अखर्चित रक्कम रुपये ८,५६३ निधित जमा केल्याचे चलन लेखापरीक्षणास दाखविण्यात आले नाही.

(३) रोखीने प्रदानाच्या रुपये ३,९७,७५० च्या पावत्या लेखापरीक्षणास दाखविण्यात आल्या नाहीत

(४) शिक्षणाधिकारी (प्रा.), वर्धा यांनी संबंधित प्रदान रोखीने वाटप करण्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे आदेश घेतल्याचे दिसत नाही. त्यामुळे केलेली कार्यवाही आक्षेपार्ह आहे. संबंधिताना वाटप करण्यासाठी सौ.आर.आर.भोयर यांची नियुक्ती केल्याचे आदेश नस्तीला आढळत नाही. तसेच प्रति विद्यार्थी प्रति दिवस ५० पैसे प्रमाणे अन्न शिजविण्याचे विवरणपत्र गट शिक्षणाधिकारी यांचेकडून प्राप्त केल्याचे दिसत नाही.

उपरोक्त अभिप्रायसंदर्भात जिल्हापरिषद वर्धा यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

(१) शासन निर्णय दिनांक १६ मे २००२ व ३ मे २००३ अन्वये जि.प.प्राथ. शाळांसाठी ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष व शाळा मुख्याध्यापक खाजगी प्राथमिक शाळासाठी व्यवस्थापनाचे अध्यक्ष व शाळा मुख्याध्यापक यांचे संयुक्त बँक खाते उघडण्याबाबत सुचना होत्या. त्यानुसार पंचायत समिती, वर्धा, हिंगणवाट, व कारंजा वगळता उर्वरित पाचही पंचायत समितींनी संयुक्त बँक खाते उघडणे प्रकरणी कार्यवाही पूर्ण केल्यामुळे त्यांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत देय असलेली रक्कम धनाकर्षाद्वारे अदा करण्यात आली. पंचायत समिती, वर्धा, हिंगणघाट व कारंजा यांनी बँक खाते उघडणे प्रकरणी कार्यवाही पूर्ण न केल्यामुळे शिक्षण विभागाने रोखीने रक्कम अदा करण्याचे ठरविण्यात आल्यावरुन वरील तिनही पंचायत समितीचा समावेश करवूण एकूण रक्कम रु.३,९७,७५०/- रोखीने अदा करण्यात आले. हिशेबाचे रोखपुस्तक शाळानिहाय ठेवण्यात आले. तसेच तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा.) यांचे अनियमित कामकाजाबाबत कार्यवाही करण्यांचे कार्यालयीन पत्र क्र. २८०२/ दिनांक १९/१२/०७ अन्वये शासनाकडे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(२) अखर्चीत रक्कम रुपये ८५६३/-स्वतंत्ररीत्या शासन खात्यात जमा केलेली नसून रोखपुस्तीकेतील पृ.क्र. २ प्रमाणे अखर्चीत रक्कम रु. ८५६३/- सह. पृ.क्र.११ पर्यंत अखर्चीत राहिलेल्या एकत्रीत रक्कम १,२१,७१६/- शासन खात्यात जमा करण्यात आलेली असून चलान प्रत दप्तरी जतन करवून ठेवण्यात आलेली आहे.

(३) रुपये ३,९७,७५०/- रोखीने वितरीत केलेल्या रकमेच्या पोचपावत्या उपलब्ध आहेत.

(४) रक्कम रोखीने अदा करणे पंचायत समिती, वर्धा, हिंगणघाट, व कारंजा यांनी बँक खाते उघडणे प्रकरणी कार्यवाही पूर्ण न केल्यामुळे शिक्षण विभागाने टिप्पणीतील पृष्ट.क्र.४ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे रोखीने रक्कम अदा करण्याचे ठरविण्यात आल्यावरुन वरील तिनही पंचायत समितीचा समावेश करवून एकूण रककम रु. ३,९७,७५०/- रोखीने अदा करण्यात आले हिशोबाचे रोखपुस्तक शाळानिहाय ठेवण्यात आले. तसेच तात्कालीन शिक्षणधिकारी (प्रा.) यांचे अनियमित कामकाजाबाबत कारवाई करण्याचे शासनाकडे प्रस्तावित करण्यात आले आहे.

तसेच विद्यार्थ्यांना प्रति दिवस ५० पैसे प्रमाणे अन्न शिजवून देणे प्रकरणी संबंधित पंचायत समितीकडून विवरण पत्र प्राप्त करवून घेण्यात आलेले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष-**

वर्धा जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद वर्धा यांची दिनांक २५ फेब्रुवारी २००८ रोजी साक्ष घेतली यावेळी समितीने शालेय पोषण आहार-अन्न शिजविणे मानधन वाटपातील अनियमिततेसंदर्भात संबंधित दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा.) यांच्या अनियमित  कामकाजाबाबत कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाकडे प्रस्तावित केले आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की सदर अनियमितता केव्हा झाली आणि या संदर्भातील प्रस्ताव आपण केव्हा पाठविला त्यावर असे सांगण्यात आले की, सदर अनियमितता सन २००३-२००४ मध्ये झाली आणि या संदर्भातील प्रस्ताव दिनांक १९ डिसेंबर, २००७ रोजी शासनाकडे पाठविण्यात आला. अनियमितता जर सन २००३-०४ मध्ये झाली तर मग प्रस्ताव एवढया उशीरा पाठविण्याचे कारण काय आहे अशी विचारणा समितीने केली असता प्रस्ताव पाठविण्यास उशीर झाल्याचे मान्य करण्यात आले त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, पंचायती राज समिती येणार म्हणून ही कार्यवाही करण्यात आलेली आहे समितीने पुढे अशी विचारणा केली की, वर्धा, हिंगणघाट व कारंजा पंचायत समितींनी संयुक्त बँक खाते न उघडल्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली तसेच या संदर्भात गट विकास अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले होते का यावर असा खुलासा करण्यात आला की, पंचायत समितीच्या ज्या गट विकास

अधिकाऱ्यांनी अजून बँक खाते उघडलेले नाही, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल परंतु, या संदर्भातील प्राथमिक जबाबदारी शिक्षणाधिकाऱ्यांची होती. शिक्षणाधिकाऱ्यांनी रोखीने रक्कम देण्याची परवागनी द्यायला नको होती. परंतु, त्यांनी तसे केल्यामुळे त्यांच्यावर देखील कारवाई प्रस्तावित केलेली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, वर्धा हिंगणवाट, कारंजा या पंचायत समित्यांना आपण प्रत्येकी किती रक्कम रोखीने दिली होती त्यावर असे सांगण्यात आले की, वर्धा पंचायत समितीने १.७१ लाख रुपये भरलेले आहेत, हिंगणघाट पंचायत समितीने १,५१,७५० रुपये भरलेले आहेत आणि कारंजा पंचायत समितीमार्फत ७५,००० रुपये भरण्यात आले आहेत. त्यावर समितीने लेखा संहितेनुसार ५०० रुपयांच्या वरील रक्कम रोख स्वरुपात देता येते काय अशी विचारणा केली त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, भरणा केलेली पध्दत चुकीची आहे. पंचायत समित्यांनी बँकेत खाते उघडलेले नसल्यामुळे धनाकर्शाद्वारे भरणा करण्यात यावा असे लिहिले आहे. रोखीने भरणा करुनही त्यावर लेखाधिकाऱ्यांनी सही केलेली नाही. शिक्षणाधिकाऱ्यांची मात्र त्यांवर सही आहे.

**सचिवांची साक्ष :-**

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने ६ जुलै, २०१० रोजी ग्रामविकास व शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीने अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहाराकरिता वाटप करावयाची रक्कम पंचायत समिती वर्धा, हिंगणघाट व कारंजा या तालुक्यात मुख्याध्यापकांनी बँक खाते न उघडल्याने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने त्यांना अन्न शिजविण्याचा मोबदला रोखीने दिल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. त्यामुळे तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांवर वेळीच कार्यवाही होणे अपेक्षित होते परंतु त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे विलंबाने पाठविण्यात आला याचे कारण काय आहेव या विलंबास कोण जबाबदार आहे व सदर प्रस्तावावर शासनाने काय कार्यवाही केली आहे. त्यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, प्रत्येक शाळेमध्ये मुख्याध्यापकांच्या नावे खाते उघडावे असा निर्णय सन २००२ मध्ये घेण्यात आला व सन २००३ मध्ये शासन निर्णय प्रसिध्द करण्यात आला. वर्धा जिल्ह्यात तीन तालुक्यांमध्ये मुख्याध्यापकांच्या नावे खाले उघडले नाही. शालेय पोषण आहरापासून मुले वंचित राहू नये म्हणून शिक्षणाधिकाऱ्यांनी ३ लाख ९७ हजार रुपये हे अन्न शिजवण्यासाठी रोखड स्वरुपात दिले. संबंधित अधिकाऱ्यांने सदर योजनेतंर्गत अन्न शिजवण्यासाठी देण्यात यावयाचा निधी रोखड स्वरुपात दिल्याने त्यांच्यावर "ठपका" ठेवण्याची कारवाई केली. समितीने पुढे अशी विचारणा केली की, "ठपका" म्हणजे नेमके काय करण्यात आले. त्यावर सचिव ग्रामविकास यांनी असे सांगितले की त्यांच्या सर्व्हिस रेकॉर्डवर त्याबाबतची नोंद घेण्यात येते.

**अभिप्राय व शिफारसी :**

मुख्य लेखा परिक्षकांच्या आक्षेपासंदर्भात जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, शालेय पोषण आहारातंर्गत अन्न शिजविणे मानधनाची रक्कम ग्राम शिक्षण समिती अध्यक्ष व शाळेचे सदस्य सचिव यांचे संयुक्त खाते उघडून रक्कम खात्यात जमा करण्यात यावे असे निर्देश शासनाने दिलेले असताना देखील वर्धा जिल्हापरिषदेतांर्गत वर्धा, हिंगणघाट व कारंजा या पंचायत समितीनी संयुक्त बँक खाते उघडले नाही. त्यामुळे शिक्षण विभागाने रोखीने रक्कम रुपये ३,९७,७५०/- उपरोक्त संबंधित पंचायत समितींना देण्यात आली व असे करीत असताना शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांचे आदेश देखील घेतले नाहीत ही अनियमितता लेखापरिक्षणाच्या वेळी निर्दशनास येवून ही समिती भेट देण्याच्या कालावधीपर्यंत संबंधितावर कार्यवाही करण्यात आली नव्हती. यावरुन जिल्हा परिषदमार्फत संबंधित अधिकाऱ्याच्या अनियमिततेकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

जिल्हापरिषदेने नंतर पाठविलेल्या माहितीत तत्कालीन शिक्षणाधिकारी यांच्यावर ठपका ठेवण्यात आल्याचे नमूद करण्यात आले असून जिल्हापरिषदेमार्फत सूचना देवूनही बँक खाते न उघडलेल्या शाळांच्या बाबतीत संबंधित गट शिक्षण अधिकारी यांच्यावर शासनामार्फत कारवाई करण्याचे प्रस्तावित केले आहे. परंतु शालेय पोषण आहारातील वाटप करावयाची रक्कम ज्या पंचायत समित्यांना शिक्षण विभागामार्फत रोखीने दिली त्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन संबंधित अधिकाऱ्या मार्फत झाले. त्यामुळे तत्कालीन शिक्षण अधिकाऱ्यांवर वेळीच कार्यवाही होणे अपेक्षित होते परंतु त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे फार विलंबाने पाठविला आहे त्यास कोण जबाबदार आहे त्यांच्यावर ही कार्यवाही करण्यात यावी. तसेच शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर पुढे काय कार्यवाही करण्यात आली त्याबाबतची माहिती समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावी. तसेच वर्धा, हिंगणघाट व कारंजा पंचायत समितीअंतर्गत असलेल्या गट शिक्षण अधिकाऱ्यांना सूचना देवूनही बँक खाते उघडले नाही म्हणून कारवाई प्रस्तावीत केलेल्या प्रस्तावावर पुढे काय कारवाई करण्यात आली याची देखील माहिती समितीला लवकरात लवकर पाठविण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

## <u>जिल्हा</u> परिषद सोलापूर

**३.४४७ मागासवर्गीयांचे घरावरील गवती छप्पर बदलून पन्हाळी पत्रे घालणे या योजनेवरील खर्चाबाबत (परिच्छेद क्रमांक ३.४४७)**

सन २००३-२००४च्या लेखी परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्रमांक ५६) मागासवर्गी यांच्या घरावरील गवती छप्पर बदलून पन्हाळी पत्रे घालणे या योजनेवर जिल्हा परिषद, सोलापूरने जिल्हा परिषद उपकरातून रुपये १६,४९,७८९ व विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी अनुदानात रुपये ३,२०,१६६ असा एकूण रुपये १६,६९,९४७ इतका खर्च केला आहे. त्याबाबत लेखा परिक्षकांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

१) निविदा अट क्रमांक ७ नुसार १०० रुपये ऐवजी ५० रुपयेच्या मुद्रांकावर करारनामा केल्याने ५० रुपये बाबत निधीत भरणा केल्याचे दाखवावे.

२) करारनाम्यानुसार ३१ मार्च २००४ पर्यंत साहित्य पुरवठा करावयाचा होता. त्यानुसार पोहोच पावती प्रमाणे ३१ मार्च २००४ पर्यंत साहित्य मिळाल्याचे दिसते. मात्र पंचायत समिती मंगळवेढा, दक्षिण सोलापूर यांना जकात पावती क्रमांक ८७० दि. २४ एप्रिल २००४ नुसार दि. २६ एप्रिल २००४ व २४ एप्रिल २००४ रोजी साहित्य प्राप्त झाल्याची नोंद त्यांचे साठा नोंदवहीत घेतलेली आहे. म्हणजेच पुरवठा आदेशातील अट क्रमांक ४ अन्वये मुदतीत पुरवठा न केल्याने १ एप्रिल २००४ ते २६ एप्रिल २००४ = २६ दिवसांचे दररोज रुपये २,००० प्रमाणे रुपये ५२,००० संबंधिताकडून वसूल करुन जिल्हा निधीमध्ये भरणा पूर्तता दाखविण्यात यावी.

३) सदर योजनेवरील खर्चाचे लेखे, लेखापरिक्षाणासाठी वारंवार तोंडी व लेखी मागणी करुनही पंचायत समिती बार्शी, उत्तर सोलापूर अक्कलकोट, माळशिरस, करमाळाकडील, लाभार्थी प्रस्ताव, लाभार्थी नोंदवही, साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तरी संबंधितांवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करुन योग्य लाभार्थीस लाभ दिल्याची साधारण खात्री पटवावी.

४) पंचायत समिती मंगळवेढा व दक्षिण सोलापूर यांनी प्रत्यक्षात माल दिनांक २६ एप्रिल २००४ व २४ एप्रिल २००४ रोजी प्राप्त झाला असताना दिनांक ३१ मार्च २००४ रोजी माल मिळाल्याची पोहोच कशी दिली याचा खुलासा करुन २६ दिवस कालावधीचे रुपये १६,६९,९४७ वरील व्याज नुकसानीची रक्कम परिगणित करुन संबंधिताकडून वसूल करुन जिल्हा निधीत भरणा केल्याचे दाखवावे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद सोलापूर यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.**

१) पुरवठाधार म.ल.उ.वि.म. यांचेकडून पुनश्च रुपये ५०/- चे मुद्रांक घेण्यात आलेले आहे.

२) आक्षेपात नमूद केलेप्रमाणे पुरवठादार म.ल.उ.वि.मं.यांना दंड भरण्याबाबत यांना दि.२९/१२/२००७ च्या पत्रान्वये कळविले आहे. दंड वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

३) लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याबद्दल जबाबदार कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून याबाबत त्यांचे खुलासे घेवून प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे. आक्षेपात नमूद अभिलेख आता उपलब्ध करुन घेतले असून अभिलेखाची तपासणी लेखापरिक्षण विभागाकडून करुन घेत आहोत.

४) आक्षेपात नमूद केले प्रमाणे माल ऊशीरा प्राप्त झालेले असताना मुदतीत माल प्राप्त झालेचे पोहोच देणारे गटविकास अधिकारी मंगळवेढा व दक्षिण सोलापूर यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून त्याबाबत त्यांचा खुलासा प्राप्त कार्यवाही करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष-**

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांची दिनांक २८ मे २००८ रोजी साक्ष घेतली सदर साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, सुरुवातीला १०० रुपयांऐवजी ५० रुपयांच्या मुद्रांकावर करारनामा केला होता. त्या संदर्भात दंड भरण्याची कारवाई केली आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, ५२ हजार रुपये केव्हा जमा करण्यात आले त्यावर असे सांगण्यात आले की, त्यांचे डिपॉझिट आपल्याकडे आहे. दि.१३.५.२००८ रोजी वसुलीचे आदेश देऊन त्यांच्या डिपॉझिटमधून वसुली केली आहे. रु. १,९९,६१४ इतके डिपॉझिट होते त्यातून ५२ हजार रुपये वसूल केले आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, पंचायत समिती, बार्शी/उत्तर सोलापूर/अक्कलकोट/माळशिरस/करमाळा यांच्याकडील लाभार्थ्यांची निवड योग्यरित्या केली नाही याबाबत काय कारवाई करण्यात आली आहे. त्यावर असा खुलासा करण्यात आली की, संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. असून त्यांनी उत्तरादाखल असे म्हटले आहे की, रेकॉर्ड दाखविले होते.

त्यावर समितीने अशी विचारणा केली लेखा परिक्षकांना रेकॉर्ड का दाखविण्यात आले नाही त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की त्यावर ऑडिटर चे रिमॉर्क व सह्या आहेत. त्यावेळी स्थानिक लेखा परिक्षकांनी असा खुलासा केला की, रिपार्ट फायनल करताना समाजकल्याण अधिकाऱ्यांची चर्चा केली जाते. त्यावेळी त्यांनी उप लेखापरीक्षकांच्या निदर्शनास आणले नाही. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, फील्ड पातळीवरचे रेकॉर्ड पाहिले की नाही याची त्यांनी खात्री केली नव्हती. नंतर त्यांनी नोटीस काढली ती याच बेसीसवर काढली. जेव्हा रेकॉर्ड कर्मचाऱ्यांनी आणून दाखविले त्या संदर्भात

त्यांना मोकळे सोडले नाही किंवा कारवाई देखील केली नाही. परंतु रेकॉर्ड पाहिले असून त्यावर ऑडिटरच्या सह्या होत्या. त्यावर मुख्य लेखा परिक्षकांनी असा खुलासा केला की, ऑडिटर ऑडिट करतात, डेप्युटी चीफ ऑडिटर अहवाल अंतिम करतात, समाजकल्याण अधिकारी सह्या करतात आणि मग अहवाल अंतिम होतो. पंचायती राज समितीबाबत जो मुद्दा निवड केला जातो त्याची प्रत मुख्य लेखापरीक्षकांकडे जाते. तेथून कळविले जाते की, पंचायती राज समितीला तुमचे काय म्हणणे आहे ते कळवावे. त्यांच्याकडून त्यांचे म्हणणे मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडे प्राप्त होते. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी लेखापरिक्षकांना कागदपत्रे दाखविलेली आहेत. जर त्यांनी कागदपत्रे लेखापरिक्षणाच्या वेळी दाखविली असती तर कागदपत्रे दाखवावीत, असा अभिप्राय लेखापरिक्षकांनी दिला नसता. लोकल ऑडिटर यांचे असे म्हणणे आहे की, कागदपत्रे सादर करण्यात आली नव्हती. एकवेळ असे मान्य केले की, जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी लेखापरिक्षकांनी कागदपत्रे दाखविली होती. तर मग पुढील दोन-तीन वर्षात जे लेखापरिक्षण झाले त्यावेळी हा आक्षेप काढून टाकण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेला करता आली असती. परंतु तशी कार्यवाही देखील झालेली नाही. जर कागदपत्रे सादर केल्याचे जिल्हा परिषदेने पटवून दिले तर लेखापरिक्षकांवर कारवाई करण्यास तयार आहोत. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, मधल्या चार वर्षात चार लेखापरिक्षणे झाली. त्यावेळी जिल्हा परिषदेने ही बाब लेखापरिक्षकांच्या निदर्शनास का आणून दिली नाही. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी असा खुलासा केला की, मेमो रिडिंगच्या वेळी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी काळजी घेतली नाही, ही बाब खरी आहे. मेमो रिडिंग केवळ फॉरमॅलिटी म्हणून करण्यात आले असावे, असे दिसते.

**उपरोक्त माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुद्दयाबाबतची माहिती मागविली**

मागासवर्गीयांचा लाभार्थींच्या घरावरील गवती छपरे बदलून पन्हाळी पत्रे घालणे या योजनेवरील खर्चाबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणाच्यावेळी का दाखविण्यात आली नाहीत याबाबत खुलासा करण्यात यावा.

**जिल्हा परिषद सोलापूर कडून उपरोक्त माहितीच्या मुद्दयाच्या अनुषंगाने खालील माहिती प्राप्त**

पंचायत समिती माळशिरस वगळता इतर तालुक्यांचे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. माळशिरस तालुक्यातील संबंधित कर्मचाऱ्यांने अभिलेख दाखविले नसल्याचे सिध्द झाल्याने त्यांच्या दोन वेतनवाढी तात्पुरत्या स्वरुपात दोन वर्षासाठी बंद करण्यात आलेल्या आहेत.

**सचिवांची साक्ष :-**

**उपरोक्त** माहितीच्या आधारे समितीने ग्रामविकास विभागाच्या सचिवांची ८ जून, २०१० रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की सदर प्रकरणाच्या अभिलेख्यांची पाहणी करण्यात आली असून त्यात कोणतीही अडचण राहिली नसल्याचे नमूद केले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीवरुन असे निदर्शनास आले की, मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छप्पर बदलून पन्हाळी पत्रे घालणे या योजनेवर जि.प. सोलापूरने उपकरातून रक्कम रुपये १६,४९,७८९/- एवढा खर्च केला. पुरवठाधारकाकडून मंगळवेढा व दक्षिण सोलापूर पंचायत समिती स्तरावर पत्र्यांचा पुरवठा करारनाम्यानुसार दिनांक ३१ मार्च, २००४ पर्यंत करावयाचा होता. परंतु प्रत्यक्षात साहित्याचा पुरवठा २६ दिवस उशीराने झाल्याची बाब साठानोंदवहीतील नोंदीवरुन आढळून आले. **पुरवठा आदेशातील अटीनुसार मुदतीत पुरवठा करण्यात आला नसल्याने संबंधित पुरवठाधारकाकडून दिवसाला २००० प्रमाणे २६ दिवसांचे रुपये ५२,०००/- वसूल करणे आवश्यक होते. परंतु संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनी साहित्य ३१ मार्च, २००४ रोजी प्राप्त झाल्याची पोहच दिल्याचे दर्शवून साहित्य उशीराने प्राप्त झाल्याबाबत पुरवठादाराकडून दंडात्मक रक्कम वसूल केली नाही. पुरवठा धारकाकडून दंडात्मक रक्कम नंतर वसुल करुन जिल्हा निधीत भरणा करण्यात आली परंतु संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती समितीला सचिवांच्या साक्षी पर्यंत प्राप्त झाली नाही. सबब समिती अशी शिफारस करते की, संबंधितांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला पाठविण्यात यावी.**

तसेच लेखा परिक्षणाच्या वेळी पंचायत समिती बार्शी उत्तर सोलापूर, उक्कलकोट, माळशिरस, करमाळा यांच्याकडील लाभार्थी प्रस्ताव, लाभार्थी नोंदवही, साठा नोंदवही इत्यादी अभिलेख लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. असा आक्षेप नोंदविण्यात आला आहे. **परंतु जि.प.कडून प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून आले की, पंचायत समिती माळशिरस वगळता इतर तालुक्यांमध्ये अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आले होते व त्यावर लेखापरीक्षकांनी तपासल्याबाबतच्या स्वाक्षऱ्या होत्या. असे असतांना देखील लेखापरिक्षकांनी त्यांच्या आक्षेपात माळशिरस वगळता इतर तालुक्यांची नावे कशाच्या आधारावर नमूद केली यांचा खुलासा झाला नाही. सबब लेखापरिक्षकांनी एखादा आक्षेप नोंदवताना** त्याबाबत योग्य ती खात्री करुन घ्यावी.

तसेच माळशिरस तालुक्यातील संबंधितांनी लेखापरिक्षकांना कागद पत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत. त्याबाबत समिती असे मत व्यक्त करते की, शासनामार्फत लेखापरिक्षकांना आवश्यक असणारी कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके काढून निर्देश दिले आहेत. परंतु त्या निर्देशाचे पालन सदर

प्रकरणी झाल्याचे दिसून आले नाही. **सबब समिती अशी शिफारस करते की शासनाच्या परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या सूचनांचे काटकोरपणे पालन करणे आवश्यक असून अशा सूचनांचे ज्या क्षणी उल्लंघन झाल्याचे आढळून येईल त्याचवेळी संबंधितांना कार्यवाही करण्यात** यावी अशा प्रकारच्या सूचना सर्व संबंधिता देण्यात याव्यात.

# परिशिष्ट
# समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

## गुरुवार, दिनांक २७ डिसेंबर, २००७
## स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, चंद्रपूर

### उपस्थिती

१. श्री.राजन पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.

३. श्री.दिलीप बनसोड, वि.स.स.

४ श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स.

५ श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

६ श्री.सुभाष बने, वि.स.स.

७ श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.

८ श्री.सुनिल केदार, वि.स.स.

९ श्री.विश्वास नांदेकर, वि.स.स.

१० श्री.संजय राठोड, वि.स.स.

११ श्री.अतुल देशकर, वि.स.स.

१२ श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

१३ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

१४ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव
श्री.आर.आर.काठे, समिती अधिकारी

**मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी (लेखा) :**
श्रीमती भारती झाडे, उप मुख्य लेखा परिक्षक वरिष्ठ

**विभागीय प्रतिनिधी :**
श्री.र.ना.अंबरित, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

## चंद्रपूर जिल्हापरिषदचे अधिकारी :-

१. श्री.व्ही.एस.बरडे, प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी

२. श्री.एम.एस.वानखेडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)

३. श्री.आर.पी.सवालाखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं)

४. श्रीमती शैलजा जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)

५. श्री.के.ए.परदेशी, प्रकल्प संचालक, जिग्रावियं

६. श्री.एस.डी.चव्हाण, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

७. श्री.डी.एम.मानकर, कृषी विकास अधिकारी

८. श्री.अे.वेंकटराव, कार्यकारी अभियंता (सिंचाई)

९. श्री.एस.बी.झोडपे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

१०. श्री.एम.बी.मैदमवार, कार्यकारी अभियंता (ग्रापापू)

११. डॉ.व्ही.एन.कारगिरवार, जिल्हा आयोग्य अधिकारी

१२. श्री.बी.एस.खामणकर, जिल्हा साधन गट प्रमुख, जलस्वराज्य

१३. श्री.के.आर.कुलाल, शिक्षाधिकारी (प्राथ)

१४. श्री.बी.व्ही.टेकाम, शिक्षाधिकारी (माध्य)

१५. डॉ.आर.डी.देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

१६. श्री.आर.एस.पांडे, समाज कल्याण अधिकारी

१७. श्री.शिषीर घोनमोडे, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) व तालुका स्तरावरील अधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने चंद्रपूर जिल्हापरिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील चंद्रपूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

## सोमवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २००८
## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, वर्धा

### उपस्थिती

१. श्री.राजन पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स.
३. श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.
४. श्री.राजेंद्र मुळक, वि.स.स.
५. श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.
६. श्री.सुनील केदार, वि.स.स.
७. श्री.विश्वास नांदेकर, वि.स.स.
८. श्री.संजय राठोड, वि.स.स.
९. श्री.अतुल देशकर, वि.स.स.
१०. श्री.उत्तम इंगळे, वि.स.स.
११. श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.
१२. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव

**मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी (लेखा),**
श्री.डी.डी.द्वारके, मुख्यलेखापरिक्षक

**विभागीय प्रतिनिधी**
**ग्रामविकास विभाग**
श्रीमती मा.प्र.कुळकर्णी, उप सचिव
श्री.कृ.शे.कांबळे, अवर सचिव

**वर्धा जिल्हा परिषदेचे अधिकारी**

१. श्रीमती ग ुंजन किन्नु, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. डॉ.सुनील गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.अशोक ठाकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
४. श्री.वसंत बेलेकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
५. श्री.अरुण मोहोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.)

६. श्रीमती शं.अ.डोंगरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
७. श्रीमती लिना बनसोड, प्रकल्प संचालक , जि.ग्रा.वि.यं.
८. डॉ. प्रेम कळसाईत, जिल्हा आरोग्य अधिकारी
९. डॉ.दिलीप घोरपडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
१०. श्री. भुषण मून, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
११. श्री.सुरेश हं ुगे, कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा.
१२. श्री.ए.बी.खडसे, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)
१३. श्री.अब्दुल रफीक रशीद, कार्यकारी अभ्यिंता (ग्रा.पा.पु.)
१४. श्री.एस.बी.सिंग कार्यकारी अभियंता, सर्वसाक्ष अभियान
१५. श्री.अर्जून तांदळे, जिल्हाअधिक्षक, कृषी अधिकारी
१६. श्री.वि.पु.याउल, कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी आर्वी
१७. श्री.सु.मा.घडे, कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी वर्धा
१८. श्री.प्रदिप भोगले, समाज कल्याण अधिकारी
१९. श्री.नारायण् ं जोशी, प्र.शिक्षण अधिकारी (माध्यमिक) शिक्षणाधिकारी(निरंतर)
२०. श्री. निगुर्णशा ठमके, शिक्षण अधिकारी (प्राथमिक) (प्रभारी)
२१. श्री.श्रीकांत पेंदाम, प्र.व.ले.अ.
२२. श्री.जी.सी.रुद्रकार, गट प्रमुख, जल स्वराज्य
२३. श्री.आर.एम.पवार, गट विकास अधिकारी, वर्धा
२४. श्री.एस.एन.मेश्राम, गट विकास अधिकारी, सेलू
२५. श्री.व्ही.एम.जाधव, गट विकास अधिकारी, देवळी
२६. श्री.के.सी.जाधव, गट विकास अधिकारी, आर्वी
२७. श्री.एस.एल.दुसाने, गट विकास अधिकारी, आष्टी
२८. श्री.व्ही.डी.बोरकर, गट विकास अधिकारी, कारंजा
२९. श्री.व्ही.के.धापके, गट विकास अधिकारी, हिंगणघाट
३०. श्री.सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, समुद्रपूर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने वर्धा जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षापुनर्विलोकन अहवालातील वर्धा जिल्हापरिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक २८ मे, २००८
## स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, सोलापूर

### उपस्थिती

१. श्री.राजन पाटील, वि.स.स तथा समिती प्रमुख

२. श्री.नाना पंचबुद्धे, वि.स.स.

३. श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स.

४. श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

५. श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.

६. श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

७. श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

८. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

९. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.वि.वा.देशमुख, उपसचिव

श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव

**मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी (लेखा):**
श्री.डी.डी. द्वारके, मुख्य लेखा परीक्षक

**विभागीय प्रतिनिधी**

**ग्रामविकास विभाग :**

श्री.र.न.अंबरित,उप सचिव

श्री.रा.शं.नांगरे, अवर सचिव

## सोलापूर जिल्हापरिषदचे अधिकारी :-

१. श्री.सुनिल मधुकरराव केंद्रेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी.

२. श्री.बी.बी.नेमाणे, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.

३. श्री.के.डी.बोने, गटप्रमुख, जलस्वराज्य.

४. श्री.एस.आर.भोसले, मुख्य लेखा वित्त अधिकारी.

५. श्री.डी.बी.मुंढे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र).

६. श्री.एस.व्ही.धोत्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं).

७. श्री.विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक).

८. डॉ.सी.आर.चिलगुंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी.

९. श्री.प्रदीप मोरे, शिक्षणाधिकारी (प्रा).

१०. श्री.एम.एन.वीर, शिक्षणाधिकारी (माध्य).

११. श्री.श्री.कृष्ण कदम, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण).

१२. श्री.एस.ए.चौधरी, कार्यकारी अभियंता बांधकाम-१

१३. श्री.बी.एस.भोसले, कार्यकारी अभियंता बांधकाम-२

१४. श्री.एन.डी.काटे, कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर).

१५. श्री.व्ही.व्ही.पवार, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.).

१६. श्री.एम.बी.बनसोडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी.

१७. श्री.आर.बी.चलवदे, कृषी विकास अधिकारी.

१८. श्री.एम.एन.कावळे, समाजकल्याण अधिकारी.

१९. श्री.दिलीप झेंडे, जि.अ.कृ.अ.सोलापूर.

२०. डॉ.महेंद्र नगरे, जि.श.चि. सार्वजनिक आरोग्य.

२१. डॉ.रमेश सोनावणे, जिल्हा वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य.

२२. डॉ.द.प.गायकवाड, जिल्हा पशुसंवर्धन, उपायुक्त सोलापूर.

२३. डॉ.संजय कोंडुसैरी, प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी.

२४. श्रीमती पलांडे, का.अ. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

२५. श्री.रविशंकर चलवदे, कृषी विस्तार अधिकारी.

२६. आर.बी.गायकवाड, अक्कलकोट, गट विकास अधिकारी.

२७. पी.पी.मरोड, मोहोळ, गट विकास अधिकारी.

२८. श्री.एस.आर.चिटणीस, पंढरपूर, गट विकास अधिकारी.

२९. श्री.आर.एन.गुरव, कुर्डूवाडी, गट विकास अधिकारी.

३०. श्री.पी.एल.जाधव, माळशिरस, गट विकास अधिकारी.

३१. श्री.जे.आर.आडसळू, सांगोला, गट विकास अधिकारी.

३२. श्री.बी.एम.वासुदेव, दक्षिण सोलापूर, गट विकास अधिकारी.

३३. श्री.एस.व्ही.करडे, उत्तर सोलापूर, गट विकास अधिकारी.

३४. व्ही.टी.साबळे, मंगळवेढा, गट विकास अधिकारी.

३५. श्री.एस.के.चिल्लाळ, बार्शी, गट विकास अधिकारी.

३६. श्रीमती एस.आर.खराडे, करमाळा, गट विकास अधिकारी.

## संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने सोलापूर जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षापुनर्विलोकन अहवालातील सोलापूर जिल्हापरिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक १२ मे, २०१०
## स्थळ : विधान भवन मुंबई

**उ प स्थि ती**

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
३. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
४. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
५. डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.
६. श्री. सुरेश खाडे, वि.स.स.
७. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
८. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
९. श्री. अनिल राठोड, वि.स.स.
१०. श्री. दादाजी भुसे, वि.स.स.
११. प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
१२. ॲड. उषा दराडे, वि.प.स.
१३. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

**मुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी (लेखा )**
श्री. शं.धे.चव्हाण, सहमुलेप, स्थानिक निधी,लेखा

**विभागीय प्रतीनिधी**

(१) श्रीमती शर्वरी गोखले, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(२) श्री. संजयकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
(३) श्री. सुनील पोरवाल, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, जलसंधारण विभाग
(४) श्री. पी.एस.मीना, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
(५) श्रीमती मालिनी वि. शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
(६) श्री. नानासाहेब पाटील, प्रधान सचिव, कृषी विभाग
(७) श्रीमती वंदना कृष्णा, सचिव, महिला व बालविकास विभाग
(८) श्री. राजेश अग्रवाल, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(९) डॉ. प्रदीप व्यास, सचिव, वित्त विभाग
(१०) श्री. गं.म.कंधारे, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(११) श्री. सुब्रत रथो, सचिव, ऊर्जा
(१२) श्री. आर.जी.सय्यद, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. अशोक पवार , वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण

**जिल्हा परिषद, चंद्रपूर**

(१) डॉ. विपिन शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. एस.एस.गव्हाणकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, जलसंधारण विभाग,प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, कृषी विभागा, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, सचिव, वित्त विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, ऊर्जा विभाग, यांची साक्ष घेतली.

**बुधवार दिनांक ९ जून, २०१०**
**स्थळः विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती**

२) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. समिती प्रमुख
३) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
४) श्री.खुशाल बोपचे, वि.स.स.
५) श्री.सुरेश खाडे, वि.स.स.
६) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
७) श्री.नितीन भोसले, वि.स.स.
८) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
९) ॲड.उषा दराडे, वि.प.स.
१०) श्री.सय्यद पाशा पाटेल, वि.प.स.
११) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय -**
(१) श्री.भा.ना.कांबळे - सह सचिव.
(२) श्री.जितेंद्र भोळे - अवर सचिव.

**मुख्यलेखा परीक्षक, स्थानिक निधी (लेखा )**
श्री.शं.धे.चव्हाण, सहमुख्य लेखा परीक्षक

**विभागीय प्रतीनिधी**
श्री.सुधीर ठाकरे - सचिव._ग्रामविकास विभाग
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव,पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
श्री.प्रदीप व्यास - सचिव (व्यय), वित्त विभाग
श्री.संजय कुमार - प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग तसेच अति.कार्य.सामाजिक न्याय विभाग
श्री.जयंत बाँटिया, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
श्रीमती शोमिता विश्वास, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
श्री.जी.एम.कंधारे - सचिव,_सार्वजनिक बांधकाम विभाग
डॉ.विपिन शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने सचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव व्यय वित्त

विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग तसेच अति.कार्य.सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, सचिव,_सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार दिनांक ६ जुलै, २०१०**
**स्थळ : विधान भवन,मुंबई**

**उपस्थिती**

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
३) श्री.बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.
४) श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.
५) श्री.सुरेश खाडे, वि.स.स.
६) श्री.विष्णु सावरा, वि.स.स.
७) श्री.नितीन भोसले, वि.स.स.
८) श्री.सुरेश नवले, वि.स.स.
९) ॲड.उषा दराडे, वि.प.स.
१०) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.बी.एन.कांबळे, सहसचिव,

**मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी (लेखा )**
श्री.प्र.ना.पांढरीपांडे

**विभागीय प्रतीनिधी**
श्रीमती शर्वरी गोखले, अति. मुख्य सचिव_सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय
श्री.संजय कुमार, प्रधान सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय
श्री.सतिश गवई, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव,पाणी पुरवठा विभाग, मंत्रालय
श्री.सुभाष ठाकरे, सचिव_ग्रामविकास विभाग, मंत्रालय
श्रीमती लिना बन्सोड, मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे बैठकीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्यांवर अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, शालेय

शिक्षण विभाग, अति. मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ८ जून, २०१०**
**विधान भवन, मुंबई**

उ **प स्थि ती**
१) श्री. बबनराव शिंदे, वि. स. स. समिती प्रमुख
२) श्री. प्रशांत ठाकूर, वि. स. स.
३) श्री. बच्चू कडू, वि. स. स.
४) श्री. बापुसाहेब पठारे, वि. स. स.
५) श्री. सुरेश खाडे, वि. स. स.
६) श्री. विष्णू सावरा, वि. स. स.
७) श्री. विजयराव औटी, वि. स. स.
८) श्री. नितीन भोसले, वि. स. स.
९) ॲड. उषा दराडे, वि. प. स.
१०) श्री. सय्यद पाशा पटेल, वि. प. स.

महाराष्ट्र **विधानमंडळ सचिवालय**
श्री. भा. ना. कांबळे, सह सचिव
श्री. जितेंद्र भोळे, अवर सचिव

**मुख्यलेखा परीक्षक,स्थानिक निधी (लेखा)**
श्री. शं.धे.चव्हाण, सहमुख्य लेखा परीक्षक

**विभागीय प्रतीनिधी**
१) श्री. सुधीर श्रीवास्तव, प्रधान सचिव (वि. सु.) वित्त विभाग
२) श्रीमती मालिनी वि. शंकर, प्रधान सचिव पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
३) श्री. संजय कुमार, प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग तसेच अति.कार्य.सामाजिक न्याय विभाग
४) श्री. जयंत बाँठिया, प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
५) श्री. सुधीर ठाकरे, सचिव ग्रामविकास विभाग
६) श्री. विरेंद्र सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी
७) श्री. प्रकाश दुधलकर, उप सचिव कृषी विभाग
८) श्री. शोमिता बिश्वास, सह सचिव सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
९) डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव ग्रामविकास विभाग

१०) श्री. एकनाथ मोरे, उप सचिव ग्रामविकास विभाग
११) श्री. दि.ग.मोरे, उप सचिव ग्रामविकास विभाग
१२) श्री. राठोड, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग

**जिल्हा परिषद, सोलापूर**
डॉ. सी.आर.चिलगुंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री. बी.एस.भोसले, कार्यकारी अभियंता,बांधकाम
श्री. आर.एस.पाटील, कार्यकारी अभियंता

**जिल्हा परिषद, चंद्रपूर**
डॉ. विपिन शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी

## संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सोलापूर व चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे बैठकीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्यांवर अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने सचिव ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव (वि. सु.) वित्त विभाग, प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग तसेच अति.कार्य.सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, उप सचिव कृषी व पदुम विभाग यांची साक्ष घेतली.

**दिनांक - ०९ डिसेंबर, २०१०**
**स्थळ : विधान भवन, नागपूर**

**उपस्थिती**

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

३ श्री.बच्चू कडू ऊर्फ ओमप्रकाश, वि.स.स.

४ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

५ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

६ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

७ श्री. नितीन भोसले, वि.स.स.

८ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

९ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

१० श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव,

श्री.विलास आठवले, अवर सचिव,

श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त**

समितीने बैठकीत समितीच्या तिसऱ्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.